.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
षय :..ब्रा.-वा.
. क्र. : २३८२
BVBK-0402382

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. २३०२ दिनांक ३०/९/९८
विषय कथा क्र..........

# विज्ञानकथा

भाग ४ था

अविनाश कोलारकर

हल्ली मुलांना
विज्ञानकथेचे वेड आहे
विज्ञान युगात
एकवीसाव्या शतकाकडे जाताना
अशा कथांची गरज आहे.
यातील अनेक कथांना बक्षिसेही मिळाली आहेत.
गाजलेल्या विज्ञानकथा

प्रकाशक :
म. ना. जोशी
सन् पब्लिकेशन्स
३१७, नारायण पेठ,
दैनिक प्रभातसमोर,
पुणे - ३०.
फोन नं. ४४९५४१

सर्व हक्क सुरक्षित


लेखक - अविनाश कोलारकर

मुद्रक :
ना. गो. जोशी
अतुल एजन्सी
३१७, नारायण पेठ,
पुणे - ३०.

मुल्य १५ रु.


४ पुस्तकांचा संच मूल्य ६० रु.

**प्रकाशन – १५ ऑगस्ट ८९**





मागील भागावरून क्रमशः    पुढे चालू.



# १७. शीतग्रह

मध्यरात्र झालेली होती. गार वारा सुटला होता. त्या भव्य प्रयोगशाळेच्या चौथ्या मजल्यावर अजून दिवे प्रकाशत होते. गेले आठ दिवस शास्त्रज्ञ राकेश आणि विश्वास एका महत्त्वाच्या प्रयोगात गुंतले होते. रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनांचा आवाज येत होता. रेल्वेच्या शिट्टीचा आवाज त्या शांत वातावरणात घुमत होता. प्रयोगशाळेच्या समोर असणाऱ्या टेकड्या धुक्यात गुरफटल्या होत्या. झगमगणाऱ्या दिव्यात शहर बुडून गेले होते. तेवढ्यात जवळजवळ पळतच शिपाई आला.

'साहेब,' तो शास्त्रज्ञांना म्हणाला.'

काय आहे? शास्त्रज्ञ राकेश यांनी विचारले.

'पलीकडच्या हॉलमधील टेलिप्रिंटर आपोआप सुरू झाला आणि...'

'टेलिप्रिंटर सुरू झाला? चला, कदाचित् एखादी महत्त्वाची बातमी असेल.' विश्वास म्हणाले.

दोन्ही शास्त्रज्ञ मग वेगाने त्या हॉलच्या दिशेने निघाले. 'टिक् ऽ टिक् ऽ टक् ऽ टक् ऽ' टेलिप्रिंटरचा आवाज त्या शांत वातावणात स्पष्ट जाणवत होता. बघतात

तर काय? कोठल्यातरी वेगळ्याच लिपीत संदेश येत होता.

'आश्चर्यच म्हणायचे!' दोन्ही शास्त्रज्ञ म्हणाले.

ती लिपी त्यांनाही अपरिचितच होती. संदेश इतक्या वेगाने येत होता की, त्यामुळे टेलिप्रिंटरचा आवाज नेहमीपेक्षा कितीतरी जास्त होता. त्या संदेशापाठोपाठ टेलिप्रिंटरला संलग्न असणाऱ्या एका विशिष्ट धातूच्या पत्र्यावर एक विचित्र आकृती कोरली गेली. दोन्ही शास्त्रज्ञ आश्चर्यचकित होऊन बघतच राहिले. शिपाईसुद्धा शांतपणे हा सारा प्रकार बघत होता. 'टीं s टीं s टीं s' असा आवाज झाला नि मग संदेश येणे थांबले. धातूच्या पत्र्यावर कोरल्या गेलेल्या आकृतीचा काहीच उलगडा होत नव्हता.

'आत्ता माझ्या लक्षात आले!' राकेश म्हणाले.

'काय?' विश्वास म्हणाले.

'हा कोणत्यातरी परग्रहावरून आलेला संदेश असावा.'

'शक्य आहे.'

'विश्वास, तुम्हाला आठवत असेल...'

'काय?'

'आपण जवळजवळ पंधरा वर्षांपूर्वी रेडिओ-ॲक्टिव्हद्वारे आपल्या सूर्यमालेसह इतर अनेक ग्रहांकडे संदेश पाठविले होते आणि ज्या ज्या ग्रहांवर प्रगत जीवसृष्टी असेल, त्या त्या ग्रहांकडून आपल्या संदेशांना उत्तरे येण्याची शक्यता होती. मला वाटते त्यापैकीच एखाद्या प्रगत जीवसृष्टी असलेल्या ग्रहावरून आपल्या संदेशाला उत्तर आले असावे.'

'अगदी शक्य आहे, पण भाषातज्ज्ञांच्या मदतीशिवाय काही उलगडा होणे शक्य नाही.'

'यू आर राईट! मला वाटते आपण असे करूया...'

'सांगा तरी.'

'उद्याच आपण भाषातज्ज्ञांची एक अर्जंट मीटिंग घेऊ या.'

'चालेल.'

'आपण त्या आकृतीचे काय करायचे?'

'एकदा त्या संदेशाचा उलगडा झाला, म्हणजे त्या आकृतीचाही अर्थ स्पष्ट होईल.'

दुसऱ्या दिवशी प्रयोगशाळेतल्याच एका मोठ्या हॉलमध्ये देशातल्या निष्णात भाषातज्ज्ञांची मीटिंग भरली. पंखे गरगरत होते. एका गोलाकार टेबलाभोवती सारे बसले होते. प्रत्येक भाषातज्ज्ञाला आदल्या दिवशी टेलिप्रिंटरवर आलेल्या संदेशाची एक प्रत देण्यात आली होती. तसेच त्या धातूच्या पत्र्यावर कोरल्या गेलेल्या आकृतीचा फोटोही देण्यात आला होता. प्रत्येक भाषातज्ज्ञाने तो संदेश नि ती आकृती काळजीपूर्वक बघितली.

'तर मित्रांनो, आपल्याला या संदेशाचा अर्थ लवकरात लवकर लावायचा आहे. मला आशा आहे की, हे काम आपण शक्य तितक्या लवकरच कराल.' शास्त्रज्ञ विश्वास आपल्या भाषणात म्हणाले.

'जास्तीत जास्त एका आठवड्यात या संदेशाचा अर्थ लावून देऊ.' भाषातज्ज्ञांनी शास्त्रज्ञांना सांगितले.

'हरकत नाही.' राकेश त्यांना म्हणाले.

त्यानंतरचा तिसरा दिवस. 'ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ' प्रयोगशाळेतील फोनची घंटा वाजली.

'हॅलो. मी शास्त्रज्ञ विश्वास बोलत आहे.' विश्वास म्हणाले.

'ऐका, एक आनंदाची बातमी आहे.' भाषातज्ज्ञ बोलत होते.

'काय सांगा तरी.'

'त्या संदेशाचा अर्थ उलगडला नि त्या आकृतीचाही...'

'व्हेरी गुड्! मग असे करूया. आज संध्याकाळी मीटिंग घेऊ या.'

'व्हाय नॉट! मीही तेच सुचविणार होतो.'

'अरे, जा, शास्त्रज्ञ राकेशांना मी बोलावले आहे म्हणून सांग.' विश्वास शिपायाला म्हणाले. लगेच राकेश आले.

'त्या संदेशाचा अर्थ उलगडला नि त्या आकृतीचाही. न[illegible]ताच फोन येऊन गेला भाषातज्ज्ञांचा.'

'दॅटस् फाईन!' राकेश म्हणाले.

त्याच दिवशी संध्याकाळी ठरल्याप्रमाण मीटिंग भरली. हॉलच्या मोठ्या खिडक्यांमधून संध्याकाळचा गार वारा [illegible] दिगणा[illegible] टेकड्यांवर रंगीबेरंगी ढग स्थिरावलेले होते [illegible] संदेशाचा अर्थ सांगण्यास सुरुवात केली.

'आपण आमच्या ग्रहाकडे पाठविलेला संदेश मागेच मिळाला होता. मात्र त्याचा अर्थबोध होण्यास बराच काळ गेला. त्यामुळे त्याला उत्तर देण्यास विलंब झाला. क्षमस्व ! आम्ही आपणांस मित्रच मानतो. आमच्या ग्रहावर एक भयंकर संकट ओढवू पाहात आहे. आमच्या सूर्यमालेत एका अतिशीत ग्रहाने प्रवेश केला आहे नि तो ग्रह दिवसेदिवस आमच्या ग्रहाच्या दिशेने सरकत आहे. त्याचा परिणाम म्हणजे आमच्या ग्रहावरील तपमान दर दिवसागणिक खालावत चालले आहे. पाणी गोठत आहे, समुद्रातील जीवजंतू नष्ट होत आहेत. सारे जीवनच पूर्णपणे विस्कळीत झालेले आहे. आमचे शास्त्रज्ञ हरतऱ्हेचे प्रयत्न करीत आहेत, पण यश येत नाही आणि सर्वांत धोक्याची गोष्ट म्हणजे, तो शीतग्रह काही महिन्यांतच आमच्या ग्रहावर येऊन आदळण्याची दाट शक्यता आहे. तसे झाल्यास आमचा ग्रह नष्ट होईल. इतक्या लवकर आम्ही आमचा ग्रह सोडून जाणेही आता शक्य नाही, तरी आपल्या शास्त्रज्ञांचे सहाय्य लाभल्यास यातून बचावाचा काही मार्ग निघू शकेल. हा संदेश मिळताच आपण जितक्या लवकर याल तितके चांगले. आम्ही आपली वाट बघत आहोत.'

'आणि त्या आकृतीचा अर्थ काय?' शास्त्रज्ञांनी विचारले.

'ती आकृती म्हणजे नकाशा आहे.'

'कसला?'

'त्या नकाशात त्यांच्या ग्रहाचे अवकाशातील स्थान, त्यांच्या सूर्यमालेतील स्थान, पृथ्वीपासून त्या ग्रहाचे अंतर आणि यानाचा प्रवासमार्ग दाखविलेला आहे. हा नकाशा अंतराळप्रवासात मार्गदर्शक ठरणार आहे. त्याच्या आधारे त्या ग्रहावर जाणे सोपे होणार आहे.'

दोन्ही शास्त्रज्ञांनी भाषातज्ज्ञांचे आभार मानले.

'पण विश्वास, मला प्रश्न पडला आहे की, तो शीतग्रह त्यांच्या सूर्यमालेत आला कसा?'

'तो एखाद्या दुसऱ्या सूर्यमालेतून निखळला असावा नि यांच्या सूर्यमालेत आला असावा.' शास्त्रज्ञ विश्वास म्हणाले.

'तर मग आपल्याला अवकाश-मोहिमेची तयारी करावी लागणार.'

'हो, शक्य तितक्या लवकर.'

'मात्र राकेश, आपल्याला ज्या ग्रहावर जायचे आहे, त्याचे पृथ्वीपासूनचे अंतर इतके प्रचंड आहे की, तेथे आपण योग्य वेळी पोहचू किंवा नाही, हेच सांगता येत

ाही.'

'खरे आहे.'

'म्हणजे आपल्याला प्रकाशाच्या वेगाने जाणारेच यान हवे.'

'हो ना.'

त्या दिवशी रात्री बराच वेळपर्यंत दोन्ही शास्त्रज्ञ अवकाश-मोहिमेबाबत चर्चा करीत होते.

आणि अखेर साऱ्या जय्यत तयारीनिशी भारतीय यान त्या ग्रहाकडे निघाले. पृथ्वीवरील निरीक्षकांना यानावरची घड्याळे मंदगतीने चालताना दिसत होती. ाकाशातील सर्व माहिती कॉंप्युटर्सना पुरविण्यात आली असल्याने प्रवासात तशी फारशी अडचण येत नव्हती. यान प्रकाशाच्या वेगाने जात असल्याने इंधनाचा प्रश्नच नव्हता. आता यानाने आपली सूर्यमाला ओलांडून त्या ग्रहाच्या दिशेने प्रवास सुरू केला होता.

'आम्ही निघालो आहोत. लवकरच तुमच्या ग्रहावर पोहचू.' असा संदेश शास्त्रज्ञांनी पृथ्वीवरून निघतानाच त्या ग्रहाकडे पाठविला होता. यान कोठे उतरवायचे, याची पूर्वसूचना त्या ग्रहावरून आलेल्या संदेशातच दिलेली होती.

यान त्या ग्रहावर उतरले तेव्हा तेथे अतिशय थंड, बोचरे वारे वाहात होते. त्या ग्रहावरील आकाश ढगांनी अगदी गच्च भरले होते. सर्वत्र बर्फच बर्फ साचला होता. बर्फाचा जोरदार पाऊसही पडत होता. बर्फाचे वादळ येऊन गेल्याच्या खुणा दिसत होत्या. उंच उंच झाडे पूर्णपणे बर्फात बुडाली होती. विजा कडाडत होत्या. ुरुत्वाकर्षण पृथ्वीवरील गरुत्वाकर्षणाशी मिळतेजुळतेच होते. यान उतरून थोडा वेळ जात नाही, तर त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ स्वागत करण्यास आले. एकमेकांच्या लिपीचा अर्थ उलगडल्याने विचारांची देणाणघेवाण करण्यापुरती भाषा त्यांना येत होती. त्या ग्रहावरील माणसांचा रंग करडा होता नि अंगावर विरळ केस होते.

'तुम्ही आलात हे फार बरे झाले.' त्यांचे शास्त्रज्ञ म्हणाले.

'तो शीतग्रह आता तुमच्या ग्रहापासून किती अंतरावर आहे?'

'तसे दिवसेंदिवस अंतर कमीच होत चालले आहे. महिन्याभरात तो आमच्या ग्रहावर येऊन आदळणार, हे मात्र निश्चित.'

'काळजी करू नका. काहीतरी उपाय आपण शोधून काढूच.' भारतीय शास्त्रज्ञ त्यांना धीर देत म्हणाले.

त्या ग्रहावरील लोक अतिशय भयभीत झालेले दिसत होते. त्याच दिवशी त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि भारतीय शास्त्रज्ञांची एक मीटिंग झाली. शीतग्रहाच्या प्रश्नावर चर्चा झाली.

'आपल्याला एकदा त्या ग्रहावर प्रत्यक्ष उतरून त्याची पाहणी करणे आवश्यक ठरणार आहे.' राकेश त्यांना म्हणाले.

'त्याची गरज नाही.'

'का?'

'कारण काही दिवसांपूर्वीच आम्ही त्या ग्रहावर जाऊन आलो आहोत. तेथे बर्फांचे पर्वत आहेत. यापूर्वी तरी इतका शीतग्रह आम्ही बघितला नव्हता.'

'मग त्या ग्रहाविषयीची माहिती तुमच्याजवळ असेलच.' विश्वास.

'हो, आहे ना! हे त्या ग्रहावर घेतलेले फोटो, हे त्या ग्रहाच्या कवच्याचे फोटो.'

'वा, छान! यांचा निश्चितच उपयोग होईल.' त्या फोटोंचे काळजीपूर्वक निरीक्षण करीत, भारतीय शास्त्रज्ञ म्हणाले.

'एवढेच नाही, तर आम्ही त्या ग्रहावर उतरल्यानंतर एक फिल्मदेखील घेतली होती.'

'व्हेरी गुड्! ती दाखवाल?'

'व्हाय नॉट! शुअर!'

शीतग्रहावर घेतलेली फिल्म दाखविण्यात आली. ती फिल्म बरीच मोठी होती. सर्वत्र पांढऱ्याशुभ्र बर्फाच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या. उंच उंच पर्वत होते. त्या फिल्ममध्ये त्या ग्रहावरील बर्फाचे एक वादळही चित्रित करण्यात आले होते. बर्फाचे उंचच्या उंच पर्वतच चालल्यासारखे वाटत होते. मात्र त्या शीतग्रहावरील एक भाग असा होता की, जेथे काही काळेकुळकुळीत खडक दिसत होते. भारतीय शास्त्रज्ञ अतिशय काळजीपूर्वक ती फिल्म बघत होते. संपूर्ण फिल्म बघून झाल्यानंतर शास्त्रज्ञ विश्वास त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांना म्हणाले -

'माझ्या मते या फिल्ममध्ये दिसणारे खडक ज्वालामुखींपासून बनलेले असावेत.'

'म्हणजे त्या शीतग्रहावर ज्वालामुखी आहेत?'

'निश्चितच! मात्र सध्या ते निद्रिस्त असावेत.'

'पण त्यांचा आपल्याला काय उपयोग?'

'आहे ना...'

'तो कसा काय?'

शास्त्रज्ञ राकेश त्यांना समजावून सांगू लागले -

'हे बघा, समजा आपण ग्रहावरील ज्वालामुखींचे कृत्रिम स्फोट घडवून आणले, तर त्याचा मुख्य फायदा म्हणजे तुमचा ग्रह जो दिवसेंदिवस शीत बनत चालला आहे, तो आणखी शीत न होता, येथील तपमान यापूर्वी जसे सर्वसामान्य होते, तसे होऊ शकेल, कारण त्या ग्रहावरील तपमान ज्वालामुखींच्या स्फोटांमुळे फार मोठ्या प्रमाणात वाढेल. मात्र यात एक अडचण आहे आणि ती म्हणजे त्या शीतग्रहावरील निद्रिस्त ज्वालामुखी शोधून काढण्यात आपल्याला पुरेपूर यश यायला हवे.'

'त्याची काळजी करण्याचे काहीच कारण नाही.'

'का?'

'निद्रिस्त ज्वालामुखी शोधून काढण्याची चाचणी आम्ही मागेच तयार केली आहे.'

'फारच उत्तम. मग काही प्रश्नच नाही. लवकरात लवकर त्या ग्रहावर उतरून आपण आपली योजना पार पाडू शकू.'

'पण तो शीतग्रह आमच्या ग्रहावर येऊन आदळणार त्याचे काय?'

'डोंट वरी.'

'म्हणजे?'

'शास्त्रज्ञ राकेश, तुम्हाला सारे समजावून सांगतील, पण त्याआधी शक्य तितक्या लवकर, त्या ग्रहावर जाऊन आपली योजना यशस्वीरीत्या पार पाडायला हवी.'

'याने तयारच आहेत.'

'मग उद्याच निघायला हवे.'

'चालेल.'

आपला ग्रह या प्रचंड संकटातून वाचणार, हे समजल्यामुळे त्या ग्रहावरील लोकांच्या मुखावरील चिंतेचे सावट बरेच कमी झाले होते. ते आता मनमोकळेपणाने बोलत होते.

एका सुरक्षित यानातून त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ व अंतराळवीर आणि भारतीय शास्त्रज्ञ व अंतराळवीर त्या शीतग्रहावर उतरले. त्या ग्रहावरील खडकांची एक रांग

बघताच शास्त्रज्ञ विश्वास म्हणाले, 'हे खडक ज्वालामुखींपासून बनले आहत. आपल्याला निश्चितच यश येणार.'

ज्वालामुखी शोधून काढण्याची चाचणी माहीत असली, तरी ते काम इतके सोपे नव्हते. प्रचंड शिळा कोसळाव्यात तसा बर्फपडत होता. बर्फाचे वादळ इतके प्रचंड यायचे की, पांढरेशुभ्र विशाल पर्वतच अंगावर चालून येत आहेत, असे वाटायचे. होता होता त्या शीतग्रहावरील बरेच निद्रिस्त ज्वालामुखी शोधून काढण्यात यश आले. आता कृत्रिमरीत्या त्यांचे स्फोट घडवून आणायचे होते. त्या ज्वालामुखींच्या स्फोटांची फिल्मही घेण्यात येणार होती. त्या शीतग्रहावर त्या स्फोटांमुळे प्रचंड ऊष्णता निर्माण होणार होती. ज्वालामुखींचा शोध घेता-घेता शास्त्रज्ञांना त्या ग्रहावर सजीवांचे अस्तित्व होऊन गेल्याच्या काही खुणाही सापडल्या आणि काही अवशेषही सापडले.

'मला वाटते या ग्रहावरील लोकांनी एखाद्या दुसऱ्या ग्रहावर स्थानांतर केले असावे.' राकेश म्हणाले.

अगदी ठरलेल्या वेळी त्या शीतग्रहावरील निद्रिस्त ज्वालामुखींचे स्फोट व्हायला सुरुवात झाली. ज्वालामुखींच्या विवरांतून क्षणाक्षणाला स्फोट होऊन वायूंचे विशाल लोट बाहेर पडत होते. एखाद्या भल्या मोठ्या भट्टीतून बाहेर पडणाऱ्या काळ्याकाळ्या धुरासारखे ते लोट दिसत होते. अतितप्त लाव्हारसाच्या नद्याच वाहू लागल्या होत्या. 'कड् ऽ कड्' आवाज होत होता. आजूबाजूचे सारे प्रदेश लाल-तांबड्या प्रकाशाने नुसते उजळून निघाले होते. सर्वत्र लाल-गर्द ढग तरंगत असल्यासारखे वाटत होते. खडकांचा चुरा वेगाने बाहेर फेकला जात होता. उकळता लाव्हारस वेगाने त्या ग्रहावर पसरत होता. गोठलेल्या सागरात आता प्रचंड लाटा उठत होत्या. खडकांचे प्रचंड तुकडे अतिशय वेगाने आकाशात फेकले जात होते. ते जवळजवळ नव्वद किलोमीटर उंच जात होते. आजूबाजूच्या साऱ्या प्रदेशात खडकांचा चुरा पसरत होता. क्षणाक्षणाला तेथील तपमान वाढत होते.

यान त्या ग्रहावरून निघाले तेव्हा खाली सर्वत्र आगीचा लाल सागरच पसरला आहे, असे जाणवत होते.

ते शीतग्रहावरून परतले तेव्हा त्या ग्रहावरील तपमान हळूहळू सर्वसामान्य होत होते. विस्कळीत झालेले जीवन पुन्हा सुरळीत होत होते. शीतग्रहावरील मोहीम यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल, त्या ग्रहावरील सर्वांनी त्यांचे फार आभार मानले.

'आमचा ग्रह थंड होण्यापासून वाचला, पण तो शीतग्रह या ग्रहावर येऊन आदळणार त्याचे काय?' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांनी विचारले.

'त्यावर एक प्रभावी मार्ग आहे.' राकेश.

'पण आता तर फक्त पंधरा दिवस उरले आहेत.'

'हरकत नाही. मात्र आता आम्हाला तुमची जास्तीत जास्त मदत हवी आहे.'

'बरं, हा ग्रह वाचविण्याचा मार्ग कोणता?'

'प्रतिगुरुत्वाकर्षण'

'प्रतिगुरुत्वाकर्षण?'

'हो, तेच.'

'पण ते निर्माण कसे करणार?'

'आजपासून आपण त्या कामाला लागूया.'

'चालेल, पण हाच प्रयोग आपणास आधीच करता आला असता.'

'हो ना, पण त्यामुळे तुमचा हा ग्रह आणखी कितीतरी काळ असाच शीत अवस्थेत राहिला असता.'

'या प्रतिगुरुत्वाकर्षणाचा मुख्य उपयोग काय?'

'ही यंत्रणा फारच उपयोगी ठरणार आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो शीतग्रह तुमच्या ग्रहावर येऊन आदळू शकणार नाही. एवढेच नव्हे, तर त्याला आपण हळूहळू ढकलत या तुमच्या सूर्यमालेबाहेर पाठवून देऊ. म्हणजे इतर ग्रहांनाही कसलाच धोका उरणार नाही.'

'खरेच.'

'पण यासाठी फार मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागणार.'

'हरकत नाही.'

लवकरच आपल्या ग्रहावरील जीवघेणे संकट टळणार, हे कळताच त्या ग्रहावरील लोकांच्या आनंदाला सीमाच उरली नाही. आपला नवीन जन्मच झाला आहे, असे प्रत्येकाला वाटत होते. त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि भारतीय शास्त्रज्ञ दिवस-रात्र प्रयोगात गढलेले होते. तहान-भूक ते पार विसरून गेले होते. ही मोहीम सुरू असतानाच, तो शीतग्रह त्यांच्या ग्रहाच्या अगदी जवळजवळ येत होता. मात्र आता काळजी करण्याचे काहीच कारण उरले नव्हते. तो शीतग्रह त्यांच्या सूर्यमालेतून दूर ढकलून देण्याची जय्यत तयारी झाली होती.

'मला वाटते, तो शीतग्रह दूर ढकलून देण्याच्या प्रक्रियेचे थेट प्रक्षेपण केल्यास टी. व्ही. वर ते सर्वांना बघता येईल.' राकेश म्हणाले.

'नॉट अे बॅड आयडिया, पण ते कसे शक्य होणार?'

'या तुमच्या ग्रहाभोवती एक उपग्रह फिरता ठेवला की झाले.'

'चालेल.'

त्या दिवशी त्या ग्रहावरील जवळजवळ प्रत्येकजण टी. व्ही. बघत होता. आता त्यांना त्यांच्या ग्रहाच्या अगदी जवळ आलेला शीतग्रह बघायला मिळणार होता. एवढेच नव्हे, तर तो ग्रह दूर कसा लोटला जाणार, हेही कळणार होते आणि अखेर प्रक्षेपण सुरू झाले. टी. व्ही. वर फुटबॉलच्या आकाराचा एक पांढराशुभ्र नि चकचकीत गोळा दिसू लागला. तोच शीतग्रह होता. त्या पांढऱ्याशुभ्र गोळ्यासमोर एक नारिंगी वलये असलेला एक छोटा चेंडू दिसत होता. तो त्यांचा ग्रह होता आणि मग प्रचंड प्रतिगुरुत्वाकर्षणाचा उपयोग करून तो शीतग्रह दूर लोटण्याची प्रक्रिया सुरू झाली. साऱ्यांची नजर उत्सुकतेने टी. व्ही. वर खिळली होती. काही वेळाने तो शीतग्रह आकाराने लहान लहान होत असल्याचे दिसू लागले, कारण तो त्यांच्या ग्रहापासून दूरदूर जात होता. दर वीस मिनिटांनी तो ग्रह त्यांच्या ग्रहापासून किती अंतर दूर गेला आहे, हे टी. व्ही. वर दाखविले जात होते. होता होता शीतग्रह त्यांच्या ग्रहाएवढा दिसू लागला. मग दोन चेंडू दिसत राहिले. अखेर फक्त एक पांढरा ठिबकाच दिसत राहिला. मात्र काही वेळानंतर तोही विरून गेला.

शीतग्रह आपल्या सूर्यमालेतून दूर लोटून देण्यात शास्त्रज्ञ पूर्णपणे यशस्वी झाले आहेत. आपल्या ग्रहावरील जीवघेणे संकट टळले - असे टी. व्ही. वर सांगण्यात आले.

त्यांच्या ग्रहावरील भयानक संकट टळल्यामुळे सर्वत्र आनंदी वातावरण पसरले होते. आनंदोत्सव साजरा करण्यासाठी शहराशहरातून रोषणाई करण्यात आली होती. सर्वत्र भारतीय शास्त्रज्ञांचा सत्कार करण्यात येत होता. रंगीबेरंगी फुग्यांनी आकाश भरून गेले होते. ग्रहावरील तपमान अगदी सर्वसामान्य झाले होते. सारे जीवन पूर्ववत् सुरू झाले होते.

'आता आम्हाला निघायला हवे.' भारतीय शास्त्रज्ञ त्यांना म्हणाले.

'कोणत्या शब्दात आपले आभार मानावेत, हेच कळत नाही.'

'त्यात काय, ते आमचे कर्तव्यच होते. असेच्च मैत्रीचे संबंध अवकाशात

प्रस्थापित व्हायला हवेत. आता लवकरात लवकर एकदा पृथ्वीवर या.'

'हो, अगदी जरूर. आता आपण मित्रच बनलो आहोत.'


'ती ज्वालामुखींच्या स्फोटाची नि शीतग्रह दूर लोटण्याच्या प्रक्रियेची फिल्म पृथ्वीवर दाखविण्यासाठी न्यायची इच्छा आहे.'


'अवश्य न्या.'

लगेच त्यांच्या शास्त्रज्ञांनी त्या फिल्मस् आणून दिल्या.

अखेर त्या ग्रहावरील लोकांचा निरोप घेऊन भारतीय यान पृथ्वीकडे निघाले.

***





# १८. निळया ग्रहाच्या तावडीतून सुटका

तीन शास्त्रज्ञ आणि अंतराळवीरांचे एक छोटे पथक असलेले भारतीय यान अवकाश-संशोधनासाठी निघालेले होते. आपल्या सूर्यमालेखेरीज इतर सूर्यमालांतील ग्रहांवर जीवसृष्टी अस्तित्वात आहे किंवा नाही, याचा शोध घ्यावयाचा होता. तसेच पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणात शक्य न होऊ शकणारे काही शास्त्रीय प्रयोगही, यावेळी शास्त्रज्ञ करणार होते. अवकाशात निर्वात पोकळी मिळते नि वातावरणाचा दाब नसतो. तेथे गुरुत्वाकर्षण जवळजवळ नसल्याने पृथ्वीवर जे शास्त्रीय प्रयोग यशस्वी होत नाहीत, ते तेथे यशस्वी होऊ शकतात. यान आता तारकापुंजातून जात होते. यानापासून बराच दूर असणारा एक ग्रह त्यांना दिसत होता. त्या ग्रहाभोवती निळसर वलये होती. आता यान त्या ग्रहाच्या अगदी जवळ होते. त्या ग्रहाभोवतीची वलये तेजस्वी जाणवत होती. एकाएकी त्यांच्या यानाभोवती गडद, काळसर नि धुकेरी आवरण तयार झाले आणि यान एका पोकळीत वेगाने खेचले जाऊ लागले. यानावरील त्यांचे नियंत्रण सुटले होते. एकंदरीत प्रकार काय आहे, हे त्यांच्या अजिबात लक्षात येत नव्हते. आपले यान क़ोठे चालले आहे, हे कळत नव्हते. थोड्या वेळाने ते गडद,

काळसर धुकेरी आवरण विरळले नि त्यांना लख्ख प्रकाश दिसू लागला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांचे यान त्या निळसर वलये असणाऱ्या ग्रहावर उतरले होते. एका लांबलचक सपाट मैदानावर ते होते. एका बाजूला दूरवर सागर किनारा दिसत होता. दुसऱ्या बाजूला छोट्या छोट्या टेकड्या दिसत होत्या; उंच उंच वृक्ष दिसत होते. मात्र आपले यान या ग्रहाच्या अंतर्कक्षेत कसे काय खेचले गेले, याचा ऊलगडा होत नव्हता. ते यानातून उतरले. उष्ण वारा वाहत होता. धुळीचे लोट उडत होते. प्रत्येक पाऊल उचलताना त्यांना खूप शक्ती लावावी लागत होती, कारण त्या ग्रहावरील गुरुत्वाकर्षण पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणाच्या जवळजवळ तीन पट होते. गुलाबी रंगाच्या आकाशात तांबडा सूर्य प्रकाशत होता. त्या ग्रहावरील वातावरण सजीवांना पोषक असेच होते. शास्त्रज्ञ पंकज, सुधाकर, प्रदीप नि अंतराळवीर यानाच्या आसपासच्या भागांचे निरीक्षण क़रीत होते.

तेवढ्यात अचानक दूरवरून काही वेगळ्याच आकाराची वाहने वेगाने यानाच्या दिशेने येत असलेली त्यांना दिसली. क्षणात त्या वाहनांनी यानाभोवती वेढा घातला. त्या वाहनांमधून साधारणतः दहा फूट उंचीची माणसे उतरली नि शास्त्रज्ञ व अंतराळवीरांच्या दिशेने येऊ लागली. आता ती उंच माणसे त्यांच्या अगदी जवळ येऊन उभी राहिली. त्यांचा रंग तांब्यासारखा होता. डोक्यावर तुरळक केस होते. भिवया जाड नि नाक बसके होते. डोळे तेजस्वी होते नि छोट्या दिव्यासारखे चमकत होते.

'आमचे यान या ग्रहावर असे उतरवून घेण्यामागील हेतू काय?' शास्त्रज्ञ पंकज यांनी त्यांना विचारले. मात्र एकमेकांची भाषा त्यांना कळत नव्हती. लगेच त्यांच्यापैकी एक उंच माणूस पुढे आला आणि त्याने एक छोटेसे चौकोनी यंत्र शास्त्रज्ञ पंकजांसमोर धरले नि त्यांना बोलण्यास खुणाविले. पंकजांनी मघाचाच प्रश्न त्यांना पुन्हा विचारला. त्यांचे शब्द त्या चौकोनी यंत्रात शिरताच दुसऱ्या बाजूने कोणत्यातरी वेगळ्याच भाषेतला आवाज आला. ते भाषांतरयंत्र होते. मग त्यांच्यापैकी दोन माणसे शास्त्रज्ञांशी नि अंतराळवीरांशी बोलू लागली,

'तुमचे यान या आमच्या ग्रहावर उतरवून घेण्यामागे एक उद्देश आहे.'

'कसला?' शास्त्रज्ञांनी विचारले.

'तुम्ही पृथ्वीवरून आलात ना?'

'हो! का?'

'तुमच्याकडून थोडी मदत हवी आहे आम्हाला.'

'कसली मदत?'

'तुमच्या ग्रहावर प्रभावी बॉम्स्, क्षेपणास्त्रे तयार केली गेली आहेत. असे कानावर आले आहे.'

'मग?'

'आमचे म्हणणे एवढेच की, तुम्ही तशीच काही क्षेपणास्त्रे आम्हाला बनवून द्यावीत. आमच्या शास्त्रज्ञांनी या बाबतीत बरेच प्रयत्न केले आहेत, पण म्हणावे तसे यश आले नाही.'

'पण तुम्हाला क्षेपणास्त्रे हवीत कशाला?'

'ते नंतर सांगू.'

'विज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी करण्यावर भर आहे आमचा.'

'ते काहीही असो, तुम्ही आम्हाला ती बनवून देणार की नाही, ते सांगा?'

'समजा, आम्ही ती नाही बनवून दिली तर...?'

'तर परिणाम चांगला होणार नाही. याच ग्रहावर तडफडून मरावे लागेल. कधीच पृथ्वीवर परतता येणार नाही.'

'तुम्हाला क्षेपणास्त्रांचा उपयोग काय होणार, ते आधी स्पष्ट सांगा.'

'चला, लवकरच कळेल.'

मग त्या माणसांनी शास्त्रज्ञ व अंतराळवीरांना वाहनात बसण्यास सांगितले. प्रत्येक पाऊल उचलताना बरीच शक्ती लावावी लागत होती. काहीजणांना तर त्या माणसांनी चक्क अलगद उचलून वाहनात बसविले. वाहने वेगाने निघाली. आपण खरोखरीच एका मोठ्या संकटात सापडलो आहोत, याची जाणीव शास्त्रज्ञ व अंतराळवीरांना झाली. बऱ्याच दूरवर असणाऱ्या एका उंच इमारतीच्या दिशेने वाहने भरधाव वेगाने निघाली होती. या ग्रहावरून सुटका कशी करून घ्यायची, याचेच विचार त्यांच्या डोक्यात येत होते. एका अनेक मजली इमारतीचे समोरून गाडी चालली होती. ती इमारत भव्य होती नि सभोवती विशिष्ट दगडांच्या भिंती होत्या.

'ही आमची प्रयोगशाळा!' ती माणसे त्यांना सांगत होती.

प्रयोगशाळा आता बरीच मागे पडली होती. त्या ग्रहावर उंच इमारती नि उंच उंच झाडे होती. झाडांची पाने सोनेरी होती. वाहतुकीसाठी प्रचंड रस्ते होते आणि मग गाड्या एका इमारतीपाशी थांबल्या. ती माणसे त्यांना आत घेऊन गेली. नंतर जवळजवळ

एक तास त्यांना जाड काचेच्या खोलीत ठेवण्यात आले. काही औषधे दिली गेली.

'तुमच्या ग्रहावरील रोगजंतूंचा येथे प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ही खबरदारी.' एक उंच डॉक्टर त्यांना सांगत होता. मग त्यांना एका मोठ्या खोलीत नेण्यात आले. तेथे निरनिराळ्या रंगांचे दिवे होते, यंत्रे होती. सर्वांची वैद्यकीय तपासणी तेथे केली जाणार होती. प्रथम शास्त्रज्ञ पंकजांना एका फिरत्या टेबलावर झोपविण्यात आले. त्या टेबलाच्या मागील बाजूस तीन मीटर उंचीची एक फळी होती नि त्या फळीला बोगद्यासारखे एक भले मोठे भोक होते. डॉक्टरांनी एक बटण दाबताच टेबल त्या भोकातून पटकन् आत गेले. आत वेगवेगळ्या रंगाची बटणे होती. एक मिनिट दिव्यांची उघडझाप झाली नि दोन मिनिटांनी टेबल पुन्हा बाहेर आले. सहा अंतराळवीरांपैकी एकाची तब्येत ठीक नसल्याचे सांगण्यात आले. त्याला आरामाची गरज होती. नंतर त्यांना एका गारवा असलेल्या खोलीत नेले गेले. शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांना उद्देशून ती माणसे म्हणाली-

'क्षेपणास्त्रांचा आम्हाला काय उपयोग होणार, हे तुम्हाला ऐकायचे आहे ना?'

'हो' शास्त्रज्ञ म्हणाले.

'आमच्या सूर्यमालेत एकूण वीस ग्रह आहेत. त्यांपैकी पंधरा ग्रहांवर आमचे राज्य आहे. आमचे प्रतिनिधी तेथे सारा कारभार बघतात. आमच्यासारखीच माणसे त्या ग्रहावर आहेत, पण त्यांचा फारसा विकास झालेला नाही. मात्र खेदाची गोष्ट म्हणजे, उरलेले ग्रह आमची सत्ता मानायला तयार नाहीत. त्या ग्रहांवरील संस्कृती बरीच विकसित आहे. त्यांनी जवळजवळ आमच्याइतकीच प्रगती आत्तापर्यंत केली आहे. ते ग्रह आमच्या अधिपत्याखाली यावे नि या संपूर्ण सूर्यमालेत आमचेच राज्य प्रस्थापित व्हावे, अशी आमची अभिलाषा आहे. त्यासाठी आत्तापर्यंत आम्ही त्या ग्रहांवर कित्येक आक्रमणे केली, पण विजयी होऊ शकलो नाही. त्यांनीही आम्ही तयार केलेल्या बॉम्बस् इतके प्रभावी बॉम्बस् बनविण्यात यश मिळविले आहे, त्यामुळे प्रत्येक वेळी आम्हाला माघारच घ्यावी लागली. काही प्रभावी क्षेपणास्त्रे बनविण्याचा आमच्या शास्त्रज्ञांनी खूप प्रयत्न केला. मात्र हवे तितके यश आले नाही. तुम्ही काही उत्तम क्षेपणास्त्रे बनवून दिल्यास, त्यांच्या बळावर त्या ग्रहांवर सत्ता प्रस्थापित करणे सहज शक्य होईल आणि आमचे स्वप्न साकार होईल.'

त्यांच्याकडून मिळालेली ही माहिती ऐकून शास्त्रज्ञ व अंतराळवीरांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्या माणसांची सत्तेची भूक बघून नवल वाटले. आपण

यांना काही क्षेपणास्त्रे बनवून दिली, तर ही माणसे उरलेल्या चार ग्रहांवर आक्रमण करून प्रचंड जीवांची हानी करतील, हे त्यांनी ओळखले. अखेर शास्त्रज्ञ त्यांना म्हणाले, 'पण यामुळे त्या ग्रहावरील प्रचंड माणसे प्राणाला मुकतील.'

ते आमचे आम्ही बघून घेऊ. तुम्ही क्षेपणास्त्रे बनवून देणार किंवा नाही सांगा. विचार करायला तुम्हाला एक दिवस देत आहोत. मात्र नकार दिला, तर लक्षात ठेवा, या ग्रहावरच अन्नपाण्याशिवाय तडफडून मरावे लागेल आणि होकार दिला, तर अगदी पाहुण्यांसारखे वागविले जाईल. काही कमी पडणार नाही नि सुखरूप पृथ्वीवर जाऊ शकाल.'

त्या आठहीजणांना त्या खोलीत बंद करून ती माणसे निघून गेली. त्या सर्वांची डोकी पार सुन्न पडली होती. काय करावे हेच त्यांना कळत नव्हते. क्षेपणास्त्रे बनवून दिली तर इतर ग्रहांवरील मानवजातीला जीवाचा धोका होता आणि क्षेपणास्त्रे नाही बनवून दिली, तर त्या ग्रहावरून सुटका होणे कधीच शक्य नव्हते. तेथेच त्यांना मरावे लागले असते. ते पृथ्वीवर पोहचले नाहीत, तर कितीतरी कोटी रुपये खर्च करून आखलेली, ही अवकाशसंशोधन-मोहीम वाया जाणार होती. आत्तापर्यंत अवकाशात केलेले नि यशस्वी झालेले शास्त्रीय प्रयोग वाया जाणार होते. पृथ्वीशी संपर्कसाधण्याच्या बाबतीत ट्रान्समीटर निकामी ठरला होता. काय उत्तर द्यावे, या बाबतीत ते रात्रभर विचार करीत होते.

'आपण जरा हुशारीनेच काम घ्यायला हवे.' शास्त्रज्ञ सुधाकर इतरांना सांगत होते.

'आपण आत्ताच त्यांना नकार दिला, तर या ग्रहावरच आपल्याला मरावे लागणार. त्यापेक्षा क्षेपणास्त्रे बनवून देण्यास आम्ही तयार आहोत, असे त्यांना सांगणे शहाणपणाचे ठरेल. या कामात बराच कालावधी जाणार आहे. तेव्हा नंतर येथून सुटण्याचा काही मार्ग काढता येईल.' पंकज म्हणाले.

'आम्ही क्षेपणास्त्रे बनवून देण्यास तयार आहोत.' शास्त्रज्ञांनी दुसऱ्या दिवशी त्या ग्रहावरील माणसांना सांगितले.

'पण लक्षात ठेवा, या कामात अजिबात दिरंगाई होता कामा नये. तुम्ही तयार केलेल्या क्षेपणास्त्रांची आम्ही चाचणी घेऊ. यश आले तरच येथून सुटका होईल.' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांना सांगत होते.

त्या दिवशी त्यांना चांगला आहार देण्यात आला. राहण्याची छान व्यवस्था

करण्यात आली. मग त्यांना दगडाच्या भक्कम भिंती असलेल्या प्रयोगशाळेत नेण्यात आले. एक मोठा हॉल त्यांना दाखविला गेला.

'येथेच तुम्ही काम करायचे. आवश्यक ती सर्व साधनसामुग्री पुरविण्यात येईल. मात्र काम शक्य तितक्या लवकर व्हायला हवे' त्या ग्रहावरील माणसे त्यांना सांगत होती. ज्या अंतराळवीराची तब्येत नीट नव्हती, त्याला विश्रांती घेण्यास सांगितले होते. संध्याकाळी त्याला थोडा वेळ मोकळया हवेत फिरायला सोडले जात असे, पण त्याच्यावर कडक पहारा होता. त्याच्याकडून बाहेरची परिस्थिती कशी काय आहे, याची माहिती शास्त्रज्ञ व अंतराळवीरांना मिळायची. क्षेपणास्त्रे तयार करण्याचे काम त्या मोठ्या हॉलमध्ये जवळजवळ पहाटेपर्यंत चालायचे. मग एक गाडी येऊन त्यांना घेऊन जायची व त्यांच्या राहण्याची व्यवस्था असलेल्या ठिकाणी त्यांना नेऊन सोडायची. तेथे त्यांच्यावर कडक पहारा असायचा. ज्या मोठ्या हॉलमध्ये त्यांचे काम चालायचे तेथे त्यांच्यावर देखरेख ठेवायला कोणी माणूस नसायचे. मात्र प्रत्येकावर देखरेख ठेवायला एक यंत्रमानव सतत त्यांच्या मागे उभा असायचा. हॉलमध्ये इकडून तिकडे फिरताना देखील तो त्यांच्यामागे असायचा. त्या हॉलच्या बाहेर पडायच्या दाराच्या दिशेने जाऊ लागताच, तो यंत्रमानव हात लांब करून त्यांच्या मागे जायचा. दाराबाहेर पाऊल टाकायचा प्रयत्न करताच, तो आपल्या दोन्ही हातांनी त्या व्यक्तीला पकडायचा आणि मग जोरजोरात बेल वाजायला सुरुवात व्हायची. तेथे काम करणाऱ्या आठजणांसाठी असे आठ यंत्रमानव होते. त्यामुळे त्या हॉलबाहेर पडण्याची सोयच नव्हती. ते सारे यंत्रमानव कॉम्प्युटरद्वारे कार्यान्वित केलेले होते. त्या हॉलच्या मागच्या बाजूला त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांची खोली होती आणि प्रयोगशाळेबाहेर तर कडेकोट बंदोबस्त होता. प्रवेशद्वारावर सात पहारेकरी होते. या साऱ्यांतून सुटून बाहेर पडणे नि यानापर्यंत पोहचणे, पूर्णपणे अशक्य होते. काम कोठवर आले आहे, हे त्यांचे शास्त्रज्ञ बघून जायचे.

एक दिवस गाडीने राहत्या ठिकाणी पोहचल्यावर शास्त्रज्ञ प्रदीप आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, 'या ग्रहावरून सुटका करून घ्यायची असेल, तर सर्वांत प्रथम आपल्याला एक गोष्ट माहीत करून घ्यावी लागेल आणि ती म्हणजे यान या ग्रहाच्या अंतर्कक्षेत कसे काय खेचले गेले. एखादी चांगलीशी युक्ती लढवून आपण प्रयोगशाळेतून बाहेर पडू शकू आणि यानातून वेगाने आकाशात जाऊ शकू; पण असे करताना आपले यान पुन्हा आत खेचले गेले, तर मग धडगत नाही.'

मात्र यानापर्यंत पोहचणेही सहज शक्य नसल्याचे त्यांना सहाव्या अंतराळवीराकडून कळले. तो नेहमी बाहेर लक्ष ठेवून असायचा. मग त्याने त्यांना त्या दिवशीची हकीगत सांगितली. त्या दिवशी मध्यरात्री सर्वांची नजर चुकवून तो टेकडीवरून यानाकडे जात होता. पाहतो तर यानाभोवती यंत्रमानव वर्तुळाकार उभे होते. त्यांचे लाल डोळे अंधारात चमकत होते. यानाकडे तो जाऊ लागताच जोरजोरात बेल वाजू लागली नि यंत्रमानव त्याला पकडायला आले. तो वेगाने पळत सुटला नि टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या एका झाडामागे लपला. यानाभोवती कितीतरीजण जमलेले त्याला दिसले. जीव मुठीत घेऊन त्याने राहते ठिकाण गाठले.

'तेही मला वाटते कॉम्प्युटरद्वारे कार्यान्वित केलेले असावे नि साऱ्या यंत्रमानवांचे नियंत्रणकेंद्र बहुतेक प्रयोगशाळेत कोठेतरी आहे.' पंकज म्हणाले.

'अगदी शक्य आहे.' सर्वांनी पाठिंबा दिला.

इच्छा नसतानाही क्षेपणास्त्रे तयार करण्याचे काम त्यांना करावे लागत होते. त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांच्या कामावर खूष होते. एक दिवस त्यांच्याशी चर्चा करताना शास्त्रज्ञ सुधाकर सहज त्यांना म्हणाले, 'आमचे यान तुमच्या ग्रहाच्या अंतर्कक्षेत कसे काय खेचले गेले, याचेच मला नवल वाटते.'

'त्यात काही नवल नाही. आता तुम्ही रात्रंदिवस राबून आमचे मोलाचे काम करीत आहात म्हणून तुम्हाला सांगायला हरकत नाही. त्याचे असे आहे - आमच्या ग्रहाभोवती आम्ही दोन कृत्रिम उपग्रह सतत फिरते ठेवले आहेत. आमच्या ग्रहाच्या आसपास कितीतरी अंतरावरील हालचाली त्या ग्रहाद्वारे आम्हाला कळतात आणि मोठ्या टी. व्ही. वर त्या स्पष्ट दिसतात. शत्रूपासून संरक्षण मिळविण्यासाठी याचा फार उपयोग होतो. प्रचंड चुंबकीय आकर्षणाद्वारे आम्ही इतर याने ग्रहाच्या आतमध्ये खेचून घेऊ शकतो, परंतु एकाच गोष्टीचा आम्हाला खेद आहे की, इतकी प्रगती करून देखील आम्ही प्रभावी क्षेपणास्त्रे बनविण्यात अयशस्वी झालो.'

त्या शास्त्रज्ञांचे बोलणे सर्वांनी काळजीपूर्वक ऐकले.

'या माहितीचा या ग्रहावरून सुटका करून घेण्यात नक्कीच उपयोग होईल.' त्या दिवशी प्रदीप आपल्या सहकाऱ्यांना सांगत होते.

आणि त्या दिवशी पंकजांनी एक खास युक्ती लढविली. त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांना ते म्हणाले-

'क्षेपणास्त्रे बनविण्याचे काम जवळजवळ शेवटच्या टप्प्यात आले आहे.'

'छान!'

'पण एक अडचण आहे.'

'कसली?'

'आमच्या सहाव्या अंतराळवीराचा सल्ला घ्यावा असे वाटते.'

'मग कसली अडचण?' आता बोलावून घेऊ त्याला.'

त्यांनी लगेच सहाव्या अंतराळवीराला बोलावून घेतले. सर्वांनी त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांशी चर्चा केली.

'बरं, तुमचे काम चालू द्या.' म्हणत ते शास्त्रज्ञ आपल्या खोलीत गेले.

मध्यरात्र झालेली होती. गार वारा जाणवत होता. एका गोलाकार टेबलाभोवती ते नऊजण बसले होते. यंत्रमानवही त्या गोलाकार टेबलाभोवती थोड्या अंतरावर उभे होते. शास्त्रज्ञ पंकजांनी इतर आठजणांना त्या हॉलमध्ये उगीचच दूरदूरवर जायला सांगितले. ते आठजण वेगवेगळ्या दिशांना हॉलच्या भिंतीकडे निघाले. त्यांच्या पाठोपाठ यंत्रमानवही निघाले. प्रत्येकामागे एक यंत्रमानव आपले हात लांबवून चालू लागला. पंकज एकटेच टेबलापाशी होते नि आता त्यांच्यावर देखरेख ठेवायला यंत्रमानव नव्हता. त्यांनी संधी साधली आणि हॉलच्या मागच्या दारातून ते चटकन बाहेर पडले. प्रयोगशाळेतील त्या हॉलची मागची बाजू त्यांनी आत्तापर्यंत कधीच बघितलेली नव्हती. जवळच्याच एका खोलीतून त्यांना शास्त्रज्ञांचे बोलणे ऐकू येत होते. मात्र त्यांची भाषा येत नसल्याने, ते काय बोलता आहेत ते अजिबात कळत नव्हते. त्या खोलीच्या समोर आणखी एक मोठा हॉल होता. त्या हॉलला लागूनच एक छोटी खोली होती. पंकजांनी त्या खोर्ल. डोकावून बघितले. तेथे लाल, हिरवी, निळी बटणे असलेली बरीच यंत्रे होती. त्या खोलीत अंधुक, लालसर नि हिरवा प्रकाश पसरला होता. 'टिक् s टिक्' आवाज फक्त येत होता. ते आत गेले. तेथे बरीच कॉंप्युटर्स होती. त्यांनी एका कॉंप्युटरची सर्व बटणे पटापट बंद केली नि ट्रान्समीटरने सहकाऱ्यांशी संपर्क साधला.

'यंत्रमानव पुतळ्यासारखे उभे आहेत आणि ते काहीच करू शकत नाहीत.' शास्त्रज्ञ प्रदीपांनी पंकजांना सांगितले. लगेच त्यांनी पुन्हा ती बटणे ऑन केली आणि ते त्या खोलीतून बाहेर पडले. पावलांचा आवाज न होऊ देता फार सावधपणे ते त्या खोलीला लागूनच असणाऱ्या दुसऱ्या खोलीत शिरले. तेथून एक छोटासा जिना खाली जात होता. त्या जिन्यावरून ते तळमजल्यावर गेले. हाच नियंत्रणकक्ष हे

त्यांनी ओळखले. तेथे निरनिराळ्या रंगांच्या दिव्यांचा प्रकाश पसरला होता. कितीतरी मोठाली यंत्रे होती. अनेक टी. व्ही. होते. यान ग्रहाच्या अंतर्कक्षेत ओढून घेण्याचे काम करणारे यंत्र शोधून काढण्यात त्यांना यश आले. त्यांना हायसे वाटले. त्या शांत वातावरणात 'किर् s किर्' असा आवाज घुमत होता. क्षणभरही वेळ न घालविता ते तेथून बाहेर पडले. आता पुन्हा ते त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांच्या खोलीजवळून जात होते. त्यांच्या बोलण्याचा आवाज येत होता. शास्त्रज्ञ पंकज सहज त्या खोलीकडे वळले. दाराच्या फटीतून त्यांनी आत डोकावून बघितले. आतील दृश्य बघून तर ते थक्कच झाले. त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ एका टेबलासमोर बसले होते. खोलीत मंद प्रकाश होता. एका उंच फळीवर एक भला मोठा टी. व्ही. ठेवलेला होता. रंगीत दृश्य त्यात दिसत होते. त्या निळसर वलय असणाऱ्या ग्रहाच्या आसपासच्या प्रदेशातील हालचाली अगदी स्पष्ट दिसत होत्या. लगेच पंकज त्यांचे सहकारी असलेल्या हॉलकडे परतले. तेव्हा त्यांनी सारी हकिगत सहकाऱ्यांना सांगितली.

'पण त्या चार शास्त्रज्ञांचा बंदोबस्त कसा करायचा?' एका अंतराळवीराने सुधाकरांना विचारले.

त्याच पहाटे पंकजांनी त्या ग्रहावरून पलायन करण्याचा प्लॅन आखला. सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. प्रयोगशाळेच्या मागच्या बाजूला बाहेर पडण्यासाठी एक दरवाजा असल्याचे त्यांनी सांगितले, 'यात बराच धोका आहे; पण धोका पत्करल्याशिवाय या ग्रहावरून सुटका होणे शक्य नाही.' शास्त्रज्ञ प्रदीप सांगत होते.

अखेर सारा बेत निश्चित केला गेला. त्या दिवशी त्यांना जरा नीट झोप लागली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी क्षेपणास्त्र बनविण्याचे काम जवळजवळ अर्धेच केले होते.

दुसऱ्या दिवशी रात्री त्यांनी आपण कामात अगदी गढून गेलो असल्याचे दाखविले. त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांना भेटायला आले नि त्यांनी विचारले -'काम कोठवर आले आहे?'

'जास्तीत जास्त दोन दिवसात आम्ही तुम्हाला क्षेपणास्त्र चाचणीसाठी देऊ.' प्रदीप यांनी सांगितले.

मग पंकज त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांना म्हणाले, 'आज देखील आम्हाला आमच्या

सहाव्या अंतराळवीराची मदत हवी आहे.' त्यांच्या सांगण्यानुसार मग त्याला हॉलमध्ये पाठविण्यात आले नि थोड्याच वेळात त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांच्या खोलीत परतले. रात्रीचा एक वाजला होता. सर्वत्र शांत वातावरण होते. थोड्याच वेळात आदल्या रात्रीची युक्ती लढवून शास्त्रज्ञ पंकज त्या हॉलमधून बाहेर पडले. त्यांनी कॉम्प्युटरची बटणे ऑफ करताच आठहीजणांच्या पहाऱ्यावर असलेले यंत्रमानव जागच्या जागी पुतळ्यासारखे उभे राहिले. पंकज हॉलमध्ये आले नि त्यांच्या सहकाऱ्यांसह बाहेर पडले.

'तुम्ही आठहीजण त्या शास्त्रज्ञांवर अचानक हल्ला करून त्यांचे हातपाय नि तोंड बांधून त्याच खोलीत त्यांना बंद करून ठेवा. मी तळमजल्यावरील खेचकयंत्रातील काही भाग काढून ते नादुरुस्त करून ठेवतो.' पंकज आपल्या सहकाऱ्यांना समजावून सांगत होते.

ते आठहीजण जेव्हा त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांच्या खोलीजवळ पोहचले, तेव्हा ते भल्या मोठ्या टी. व्ही. वर दिसणारी दृश्ये बघत होते. अचानक हल्ला करून आठहीजणांनी पंकजांनी सांगितलेले काम व्यवस्थितरीत्या पार पाडले. खेचकयंत्रामध्ये बिघाड निर्माण करण्यास बराच वेळ लागणार असल्याने पंकज सहकाऱ्यांना म्हणाले, 'तुम्ही सातजण पुढे चला. सुधाकरांना माझ्यासोबत थांबू द्या. आम्ही तेथे येईपर्यंत यानाची तपासणी करून ठेवा. आता अजिबात वेळ न घालविता मागच्या दरवाजाने निघा. अत्यंत सावधगिरीने यानापर्यंत पोहचा.'-

'पण त्या यानाभोवती यंत्रमानवांचा वेढा आहे, त्याचे काय?' अंतराळवीर म्हणाले.

'त्यांची नियंत्रणयंत्रणा येथेच आहे. यानापाशी पोहचेपर्यंत आम्ही ती शोधून काढू. सुधाकर नि पंकज म्हणाले'.

त्यांच्या सांगण्यानुसार मग सातहीजण प्रयोगशाळेच्या मागच्या दरवाजातून बाहेर पडले. थोड्याच वेळात यानापाशी पोहचले.

'आम्ही यानापाशी सुरक्षितपणे पोहचलो. तुम्ही लवकरात लवकर निघा. यानाची तपासणी आटोपली आहे.' शास्त्रज्ञ प्रदीप यांनी ट्रान्समीटरवरून पंकज व सुधाकर यांना सांगितले. यंत्रमानव यानाभोवती वर्तुळाकार उभे होते, पण काहीच करू शकत नव्हते.

खेचकयंत्रात बिघाड करण्यात पंकज व सुधाकर यांना यश आले. त्यांनी त्या

यंत्रातील काही भाग काढून स्वतःसोबत घेतले. ते प्रयोगशाळेतून बाहेर पडले, तेव्हा जवळजवळ साडेतीन वाजले होते. आता लवकरात लवकर त्यांना यान गाठायचे होते. प्रत्येक पाऊल उचलताना बरीच शक्ती लावावी लागत होती. प्रयोगशाळेच्या मागच्या बाजूस प्रचंड वृक्ष होते. बऱ्याच दूरवर दिसणारी टेकडी ओलांडून त्यांना यानाजवळ पोहचायचे होते. जोरदार वारा सुटलेला होता. प्रयोगशाळा मागे पडत होती. झाडांची पाने सळसळत होती. आकाशात हिरवा चंद्र प्रकाशत होता. झाडांच्या गर्द सावल्या पडल्या होत्या. किंचित धुके पडले होते. अत्यंत सावधपणे झाडामागे लपत लपत ते जात होते. त्यांचा श्वासोच्छ्वास जोरात चालू होता. आता चार वाजले होते. धुक्यात गुरफटलेल्या टेकडीच्या दिशेने ते वेगाने चालत होते. त्यांनी टेकडी चढायला सुरुवात केली. पाय दगडासारखे वाटत होते.

आम्ही टेकडी चढायला सुरुवात केली आहे - असा संदेश त्यांनी सहकाऱ्यांना दिला. ते टेकडीच्या माथ्यावर पोहचले होते. भयंकर वाऱ्यामुळे तोल सांभाळणे कठीण जात होते. दूरवर असणाऱ्या शहरातले दिवे दिसत होते. टेकडी उतरताना पाय घसरत होते. तेथे नुसता अंधारच होता, पण चंद्राचा फिकट हिरवा प्रकाश असल्याने टेकडी उतरणे सोपे गेले. आता ते पायथ्याशी पोहचले होते. दूरवर सपाट मैदानात उभे असलेले यान, धुक्यामुळे अस्पष्ट दिसत होते.

'लवकरात लवकर यान गाठा. पहाट व्हायला फारसा वेळ नाही.' सहकारी सारखे सांगत होते. अखेर त्यांनी यान गाठले. त्यांना दम लागला होता. ते घामाने चिंब झाले होते.

आणि अखेर त्यांचे यान त्या ग्रहावरून निघाले. अतिशय वेगाने ते अंधारात झेपावले. लगेच रडार-यंत्रणेची दिशाभूल करण्यासाठी वजनाने अत्यंत हलक्या असणाऱ्या चकचकीत धातूच्या कांड्या यानातून बाहेर टाकण्यात आल्या. आता त्या कांड्या बराच वेळ हवेत तरंगत राहणार होत्या आणि रडारमधून निघणाऱ्या रेडिओलहरी त्यावर आदळून परावर्तित झाल्यामुळे प्रत्यक्ष यानाचा मागोवा घेणे अशक्य होणार होते. थोड्याच वेळात यान त्या निळसर वलये असणाऱ्या ग्रहापासून बरेच दूर आले. यान त्या ग्रहाच्या अंतर्कक्षेत खेचले जाण्याची आता शक्यता नव्हती. सुटका झाल्यामुळे यानातील सर्वांच्या चेहऱ्यावर समाधान होते. लवकरच त्यांनी राहिलेले शास्त्रीय प्रयोग यशस्वीरीत्या पार पाडले नि अवकाश-संशोधन केले.


'अवकाश मोहीम आटोपून आम्ही परतत आहोत!' - असा संदेश त्यांनी पृथ्वीवर

पाठविला. आता केव्हा एकदा आपण पृथ्वीवर पोहचणार असे त्यांना झाले होते. यान वेगाने पृथ्वीकडे निघाले होते.

* * *

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २३८२ दिनांक
विषय बा.वा. क्र.





# १९. शोध

रात्री अकरा वाजेपर्यंत प्रयोग संपेल, असा शास्त्रज्ञ शर्मा व शास्त्रज्ञ विलास यांचा अंदाज होता, पण प्रयोग संपायला प्रत्यक्षात जवळजवळ एक वाजला. 'टण् ऽ' घड्याळात टोल पडला. शांत वातावरणात तो बराच वेळ घुमला.

'बापरे, एक वाजला!' शास्त्रज्ञ विलास हातातील घड्याळात बघत म्हणाले.

'हो ना, वेळेचे काही भानच नाही राहिले.' शास्त्रज्ञ शर्मा हॉलमधून बाहेर पडताना म्हणाले.

'मला तरी वाटते आजचा आपला प्रयोग बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाला आहे.' शास्त्रज्ञ शर्मा पोर्चमधून जाताना म्हणाले.

त्या शांत वातावरणात त्यांच्या बुटांचा आवाज अगदी स्पष्ट जाणवत होता. ते लिफ्टमधून बाहेर पडताच वॉचमनने मुख्य गेट उघडले नि मग दोघांच्याही कार्स प्रयोगशाळेतून बाहेर पडल्या.

'अच्छा, गुडनाईट!' दोन्ही शास्त्रज्ञ एकमेकांना म्हणाले आणि मग त्यांच्या कार्स प्रयोगशाळेसमोरून जाणाऱ्या रस्त्यावरून वेगाने धावू लागल्या. शास्त्रज्ञ शर्मांचे घर

तसे पंधरा मिनिटांच्या अंतरावरच होते. मात्र शास्त्रज्ञ विलास यांना घरी पोहचायला पस्तीस मिनिटे लागत आणि शहराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याने गेले, तर पन्नास मिनिटे लागत. रात्रीच्या वेळी शास्त्रज्ञ विलास त्या मुख्य रस्त्याने न जाता एका कमी रहदारी असणाऱ्या रस्त्याने जात. आजही त्यांची कार त्याच रस्त्यावरून भरधाव वेगाने जात होती. सोडियमचे गर्द, पिंगट दिवे मागे पडत होते. रस्ता चकचकीत वाटत होता. वाऱ्याच्या गार झोतांमुळे अगदी ताजेतवाने वाटत होते.

त्यांच्या डोक्यात ते सध्या ज्या प्रयोगात गुंतले होते, त्याचेच विचार सारखे येत होते. अचानक त्यांचे लक्ष रस्त्याच्या उजव्या बाजूला गेले, कारण एक उंच नि धिप्पाड माणूस त्यांना वेगाने पावले टाकीत जवळच असणाऱ्या एका इमारतीत शिरताना दिसला. इमारतीच्या आसपास इतका गडद अंधार होता की, ते त्या माणसाला नीट बघूच शकले नाहीत. त्यांनी कार थांबविली आणि कारमधून बाहेर येताच त्यांच्या डोळ्यांवर त्यांचाच विश्वास बसेना. त्या इमारतीच्या मागच्याच बाजूला थोड्या दूरवर असणाऱ्या शेतावर एक तेजस्वी प्रकाशझोत त्यांना दिसला. बघता बघता तो आकाशात उंच निघून गेला. ते एक यानच होते. थोडा वेळ तर ते एकटक त्या यानाकडे बघतच राहिले. अखेर यान दिसेनासे झाले. एकंदरीत प्रकार तरी काय आहे, याचाच त्यांना उलगडा होईना. तो उंच, धिप्पाड माणूस कोण असावा? ते यान परग्रहावरून तर आलेले नसेल ना? तो माणूस या उंच इमारतीत तर शिरला नसेल? असे कितीतरी प्रश्न त्यांच्या मनात डोकावून गेले.

'उद्या बघू या.' असे स्वतःशीच म्हणत ते कारमध्ये बसले नि थोड्याच वेळात घरी पोहचले. मध्यरात्री अभ्यासिकेत वाचत बसलेले असताना त्यांच्या मनात तोच विषय घोळत होता. त्या रात्री घडलेला तो प्रकार तसे बघितले तर संशयास्पदच होता. उद्या शास्त्रज्ञ शर्मांशी त्याबाबत बोलायचे असे त्यांनी ठरवले.

'काल रात्री एक विचित्रच प्रकार बघायला मिळाला.' दुसऱ्या दिवशी प्रयोगशाळेत चहा घेताना शास्त्रज्ञ विलास म्हणाले.

'असे घडले तरी काय?' शास्त्रज्ञ शर्मा.

'शहराकडे जाताना ती उच इमारत लागते बघा. त्या इमारतीत एक उंच नि धिप्पाड माणूस शिरताना दिसला नि पाठोपाठ एक यान जवळच असलेल्या शेतातून आकाशात झेपावले.'

'काय सांगताय!'

'मी त्या माणसाचा पाठलाग केला असता, पण अंधार होता. त्या इमारतीत विजेची उपकरणे बनविण्याचा कारखाना होता ना?'

'हो, पण तो तर केव्हाच बंद पडला आहे.'

'मग त्या इमारतीत राहते तरी कोण?'

'सध्या तरी कोणीच नाही. मग तो माणूस कोण असावा? नि तो त्याच इमारतीत का शिरला? हा साराच प्रकार गोंधळात टाकणारा आहे आणि ते यान...'

'मला वाटते, ते नक्कीच कुठल्यातरी परग्रहावरून आले असावे.'

'शक्य आहे.'

'आज रात्रीच आपण तेथे जाऊन एकंदरीत प्रकार काय आहे, याचा शोध घेऊ.'

'चालेल.'

'ह्याच इमारतीत तो उंच नि धिप्पाड माणूस शिरला. त्यापलीकडे त्या धुसर टेकड्या दिसत आहेत ना, त्यांच्या पायथ्याशी असणाऱ्या शेतातूनच यानाने आकाशात उड्डाण केले.'

इमारतीपासून तीसेक मीटर अंतरावर असलेल्या एका वृक्षाच्या गर्द सावलीत कोणालाही दिसणार नाही, अशा रीतीने उभे राहून शास्त्रज्ञ विलास शास्त्रज्ञ शर्मांना सांगत होते.

एक वाजून गेला होता. आपली कार त्यांनी त्या उंच इमारतीपासून थोडी दूरच उभी केली होती. आता मुख्य रस्त्यापासून ते बरेच दूर होते. आजूबाजूला सर्वत्र गडद अंधार होता. रातकिडे किरकिरत होते. पाने सळसळत होती. पावलांचा आवाज न होऊ देता, ते त्या इमारतीपाशी पोहचले. कसलीच हालचाल जाणवत नव्हती. जिना मागच्या बाजूने होता. मोठ्या सावधपणे ते जिना चढून वरच्या मजल्यावर गेले. प्रत्येक मजल्यावरील खोल्यात, हॉलमध्ये अगदी सामसूम होती आणि मग ते सर्वांत वरच्या मजल्यावर पोहचले.

'येथे तर कोणीच नाही! मग कालचा तो माणूस गेला तरी कोठे?' शास्त्रज्ञ विलास म्हणाले.

आता ते गच्चीवर पोहचले होते. तेथून त्यांनी आजूबाजूच्या प्रदेशावर नजर टाकली. सर्वत्र चिडीचिप होते. इमारतीच्या मागच्या बाजूला भिंतीच्या कंपाऊंडला लागूनच मोठमोठे वृक्ष होते. त्यांच्या गर्द सावल्या पडलेल्या होत्या. मध्यभागी पाण्याची एक मोठी चौकोनी टाकी होती.

'आज बहुतेक आपल्याला असेच परतावे लागणार.' शास्त्रज्ञ शर्मा हळुवार आवाजात म्हणाले.

त्यांनी दूरवरच्या धुकेरी टेकड्यांकडेही नजर टाकली; पण तेथेही काहीच हालचाल दिसत नव्हती. 'चला, उद्या हवे तर आणखी एकदा येऊन बघू.' असे म्हणत जिन्याच्या पायऱ्या उतरून ते खाली येऊ लागले.

मात्र अचानक त्यांना खाली कसलीतरी हालचाल जाणवली. लगेच ते जवळच असलेल्या गॅलरीत गेले नि बघू लागले. बघतात तर एक उंच नि धिप्पाड माणूस जवळच्याच पाण्याच्या मीटरच्या बॉक्सपाशी उभा होता. तो माणूस त्यांना बघू शकत नव्हता; पण त्याच्या सर्व हालचाली त्यांना स्पष्ट दिसू शकत होत्या.

'हाच तो माणूस!' शास्त्रज्ञ विलास शर्मांना सांगत होते.

'बघू या तरी काय करतोय.' शास्त्रज्ञ शर्मा म्हणाले.

क्षणभर त्या माणसाने आजूबाजूला नजर टाकली नि पाण्याच्या मीटरबॉक्सपाशी त्याने काहीतरी केले नि काय! किंचितसा 'कर्र' असा आवाज होऊन पाण्याची ती भली मोठी टाकी थोडी बाजूला सरकली. पाठोपाठ तो माणूस दिसेनासा झाला. तो अदृश्य होताच, ती टाकी पुन्हा पूर्वीच्या जागी सरकली. त्यांच्याच डोळ्यांवर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

'व्हेरी स्ट्रेंज!' शास्त्रज्ञ शर्मा उद्गारले.

'आपण थोडा वेळ वाट बघू या. नंतर हा काय प्रकार आहे, याचा शोध घेऊ या.' शास्त्रज्ञ शर्मा शास्त्रज्ञ विलास यांना म्हणाले.

जवळजवळ पाऊण तास त्यांनी वाट बघितली; पण तो माणूस परतला नाही. अतिशय काळजीपूर्वक ते त्या पाण्याच्या टाकीपाशी पोहचले. जवळच मीटरबॉक्स होती. त्या बॉक्सचे झाकण त्यांनी उघडून बघितले. मात्र मीटरशिवाय तेथे काहीच नव्हते.

'मघा तर त्या माणसाने येथेच काहीतरी केले नि टाकी सरकली.' शास्त्रज्ञ विलास म्हणाले.

'थांबा, बघतो तरी. ' म्हणत शास्त्रज्ञ शर्मांनी जवळजवळ एक फूट हात त्या बॉक्सच्या डावीकडील पोकळीत घातला.

अचानक त्यांचा हात एका कसल्याशा बटणावर जाऊन टेकला. त्यांनी ते किंचित दाबले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला, कारण ती पाण्याची

टाकी तिच्या जागेवरून थोडीशी सरकली. 'कर्र' असा आवाज झाला. लगेच ते त्या टाकीपाशी पोहचले. बघतात तर तेथे एक जिना होता.

'चला, बघू या तरी काय प्रकार आहे.' शास्त्रज्ञ म्हणाले.

थोड्या पायऱ्या उतरून जाताच त्यांना मंद प्रकाश दिसू लागला. जवळच्याच एका बोर्डवर एक लालसर बटण होते. ते बहुतेक टाकी पूर्ववत् सरकविण्यासाठी होते. ते दाबताच त्यांच्या लक्षात आले की, टाकी पुन्हा तिच्या पूर्वीच्या जागी सरकली होती. आता त्यांच्यासमोर एक लांबलचक पोर्च होता. मंद, पिंगट प्रकाश सर्वत्र पसरला होता. पोर्चच्या उजव्या बाजूला बऱ्याच खोल्या होत्या. नंतर एक हॉल होता. डाव्या बाजूला पंचकोनी खांब होते. प्रत्येक खोलीसमोर एक यंत्रमानव होता. त्याच्या डोक्यावरील अँटेनाला असलेला हिरवा दिवा सारखा लागत-विझत होता. खांबाआड लपतलपत ते दोघेही पुढे पुढे जात होते.

खोल्यात डोकावून बघणे धोक्याचे होते, कारण थोड्या वेळापूर्वी त्यांनी एका खोलीत डोकावून बघण्याचा प्रयत्न करताच 'टीर्र ऽ टीर्र ऽ' असा आवाज होऊन यंत्रमानवाच्या खांद्यावरील लालसर दिवा लागू-विझू लागला होता. तो 'टिर्र ऽ' असा आवाज होताच, एका उंच नि दणकट माणसाने लगेच बाहेर येऊन बघितले; पण सुदैवाने ते थोड्याच अंतरावरील खांबामागे जाऊन दडले. तो माणूस थोडा वेळ पोर्चमध्ये येरझाऱ्या घालून परत हॉलमध्ये शिरला.

'येथे आपण अडकलो, तर बाहेर पडण्याची शक्यताच नाही.' शास्त्रज्ञ विलास म्हणत होते.

'खरे आहे.' शास्त्रज्ञ शर्मा संमती दर्शवीत म्हणाले.

तेवढ्यात त्यांच्या लक्षात आले की, जवळच्या हॉलमधून काही माणसांच्या बोलण्याचा आवाज येतो आहे. अतिशय सावधगिरीने ते त्या हॉलपाशी पोहचले. खिडक्यांच्या फटीमधून आतील हालचाली त्यांना स्पष्ट दिसू शकत होत्या. मात्र ती एका मोठ्या टेबलाभोवती बसलेली माणसे काय बोलत आहेत, हे ऐकू येत नव्हते. त्या हॉलमध्ये निरनिराळ्या रंगांची यंत्रे होती. छोटे-मोठे टी. व्ही. होते. त्यावर कसलीतरी आकडेमोड चालू होती. ती तेथे बसलेली माणसे परस्परांशी चर्चा करीत होती. मधाचा तो माणूस हातवारे करून त्यांना काहीतरी समजावून सांगत होता. सर्वजण त्याचे बोलणे काळजीपूर्वक ऐकत होते. मध्येच कोपऱ्यातले मोठे यंत्र 'कट् ऽ कट् ऽ' असा आवाज करीत होते नि मग त्यालाच जोडून असलेल्या टी.व्ही. च्या

पडद्यावर काहीतरी लिहिले जात होते.

त्या माणसांसमोरील छोटीछोटी यंत्रे 'वीं s वीं s वीं s' असा आवाज करीत होती आणि त्यातून कोणाच्या तरी बोलण्याचा आवाज येत होता. ती माणसे आता त्या यंत्रासमोर बोलत होती. दोन्ही शास्त्रज्ञांनी भिंतीला किंचित कान लावताच त्यांना ट्रान्समीटरमधून येणारा आवाज नि त्या माणसाचे बोलणे स्पष्ट ऐकू येत होते.

'नकाशाचे काम कोठवर आले आहे?' ट्रान्समीटरमधून प्रश्न बाहेर पडला.

'होतच आले आहे. उद्या रात्रीपर्यंत बहुतेक सर्व नकाशे तयार होतील.' तो उंच नि धिप्पाड माणूस सांगत होता.

'गुड्!' पलीकडून आवाज आला.

'उद्या आम्ही याच वेळी संपर्क साधू नि सर्व योजना नीट समजावून सांगू. तसेच राष्ट्राध्यक्षांचा खास संदेश तुम्ही टी.व्ही. वर ऐकू शकाल.'

'चालेल!' सर्वजण म्हणाले नि मग ते वेगाने पावले टाकीत पलीकडच्या हॉलमध्ये निघून गेले.

त्या साऱ्या संवादाचा दोन्ही शास्त्रज्ञांना फारसा अर्थबोध होत नव्हता.

'उद्या पुन्हा येऊ या. कदाचित् काही उलगडा होईल.' शास्त्रज्ञ विलास बाहेर पडताना म्हणाले. पाण्याची टाकी त्यांनी पुन्हा पूर्ववत् करून ठेवली. थोड्याच वेळात ते कारपाशी पोहचले. साडेतीन वाजले होते. गारवा जाणवू लागला होता. कार प्रयोगशाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावरून भरधाव वेगाने धावत होती.

'हा सारा प्रकार म्हणजे एक गूढच आहे.' शास्त्रज्ञ शर्मा.

'हो ना, मला वाटते परग्रहावरील काही माणसे येथे येऊन हेरगिरी करीत आहेत.'

'शक्यता नाकारता येत नाही.'

'पण त्यांना नकाशे तरी कसले हवेत नि उद्या त्यांचे राष्ट्राध्यक्ष कसली योजना समजावून सांगणार, हेच कळत नाही.'

'बापरे, चार वाजले!' शास्त्रज्ञ शर्मा प्रयोगशाळेच्या आवारात शिरताच हातातील घड्याळात बघत म्हणाले. जाताच त्यांनी शिपायाला चहा आणण्यास सांगितले.

'तर मग उद्याचा प्लॅन आपल्याला आखायला हवा.' शास्त्रज्ञ विलास चहा घेताना सांगत होते.

'त्या खोल्यात काय आहे हे बघणे महत्त्वाचे आहे. मला तरी वाटते तेथे अतिशय महत्त्वाचे काहीतरी असावे. त्याशिवाय यंत्रमानवाचा कडक पहारा ठेवला गेला

नसता.'

'माझेही हेच मत झाले आहे.'

'आज लेसर रिव्हॉल्वर सोबत असते, तर एक-दोन यंत्रमानवांना निकामी करून ते काम सहज करता आले असते.'

'खरे आहे, उद्या सोबत घेऊया.'

'त्याचबरोबर एक टेपरेकॉर्डर सोबत घ्यावा लागेल.'

'कशाला?'

'राष्ट्राध्यक्षांचा खास संदेश टेप करूनच घ्यायला हवा, कारण ऐकण्यात व्यत्यय आला, तर त्याचा नीट अर्थबोध होणार नाही.'

'पण तो टेपरेकॉर्डर ठेवणार कोठे?'

'संदेश यायच्या बरेच आधी जाऊन आपण तो नियंत्रणकक्षातल्या टेबलाला आतून फिक्स करून ठेवू.'

'गुड् आयडिया!'

लेसर किरणांचा मारा करून एका खोलीसमोरील यंत्रमानव निकामी करण्यात त्यांना यश आले. आता त्या यंत्रमानवाच्या डोक्यावरील अँटेनाचा हिरवा दिवा लागत-विझत नव्हता.

'चला, आत काय आहे ते तरी बघू या.' शास्त्रज्ञ शर्मा म्हणाले. ते त्या खोलीच्या दारापाशी गेले. मात्र आत कसलीच हालचाल जाणवत नव्हती. दार उघडून लगेच आत गेले. त्या खोलीत मंद हिरवा प्रकाश पडला होता. समोरच एक हॉल दिसत होता. ते त्या हॉलमध्ये गेले आणि त्या हॉलमधील दृश्य बघून त्यांना धक्काच बसला, कारण तेथे निरनिराळ्या आकाराची क्षेपणास्त्रे होती. हॉलच्या पलीकडील टोकापर्यंत क्षेपणास्त्रांची रांग गेलेली होती.

'बापरे ऽ, भयानकच प्रकार दिसतोय!' शास्त्रज्ञ विलास.

'म्हणजे येथे क्षेपणास्त्रांचा भूमिगत कारखानाच आहे म्हणायचे!' शास्त्रज्ञ शर्मा.

'हो, पण या माणसांचा हेतू तरी काय असावा?'

'आपल्याला वेगाने तपास करायला हवा.'

'नक्कीच.'

'चला, आजूबाजूचेही हॉल्स् बघून घेऊ.'

'त्या सर्व हॉल्समध्ये तर पृथ्वीवरील क्षेपणास्त्रांपेक्षाही जास्त प्रभावी अशी

क्षेपणास्त्रे दिसत आहेत!'

'नक्कीच पृथ्वीवर आक्रमण करण्याचा यांचा हेतू असावा.'

'तसेच दिसते आहे.'

'संदेश यायला अजून एक तास आहे. त्यापूर्वी आपल्याला टेपरेकॉर्डर त्या नियंत्रणकक्षातील टेबलाखाली फिक्स करायला हवा. त्यांना कसले नकाशे हवेत नि त्यांची भावी योजना काय आहे, याबाबत त्यातूनच उलगडा होईल.'

'पण टेपरेकॉर्डर पुन्हा मिळवायचा कसा?'

'तोही महत्त्वाचाच प्रश्न आहे. नियंत्रणकक्षातून सर्वजण बाहेर पडल्यावरच ते काम आपल्याला करावे लागणार. त्यात धोका खूपच आहे, कारण आपल्याला बऱ्याच उशिरापर्यंत थांबावे लागणार; पण धोका पत्करल्याशिवाय हे कोडे पूर्णपणे उलगडणार नाही. आज हवी असलेली सर्व माहिती मिळाल्याखेरीज आपल्याला प्लॅनही आखता येणार नाही.'

'तेही खरेच.' शास्त्रज्ञ विलास होकार दर्शवीत म्हणाले.

ते बाहेर पडले तेव्हा पोर्चमध्ये पिंगट प्रकाश पडला होता. सर्वत्र सामसूम होती. पंचकोनी खांबांमागे लपतलपत ते नियंत्रणकक्षाच्या खिडकीपाशी पोहचले. नियंत्रणकक्षात कोणीच नव्हते. त्या कक्षाला लागूनच असलेल्या हॉलमधून काही माणसांच्या बोलण्याचा आवाज येत होता. शास्त्रज्ञ शर्मा त्या खिडकीतून लगेच आत गेले. शास्त्रज्ञ विलास आजूबाजूच्या हालचालींवर बारीक लक्ष ठेवीत होते.

तेवढ्यात पोर्चमधून एक माणूस वेगाने हॉलमध्ये शिरला. एक क्षणही वाया न घालविता शास्त्रज्ञ शर्मांनी टेपरेकॉर्डर टेबलाला फिक्स केला नि ते खिडकीतून बाहेर आले. बहुतेक कालच्याच वेळी संदेश यायला सुरुवात होईल, असा त्यांचा अंदाज होता. त्यांनी घड्याळात बघितले. अजून पंचवीस मिनिटे होती.

'मला वाटते, आपण पंचवीस मिनिटांनी पुन्हा येथे यावे, कारण आपल्याला कोणी येता-जाता बघता कामा नये.' शास्त्रज्ञ विलास म्हणाले.

नियंत्रणकक्षापासून थोड्या अंतरावर एक अंधारी खोली होती. तेथे ते गेले. त्या बाजूला सहसा कोणी फिरकताना दिसत नव्हते. त्या ठिकाणाहून त्यांना पोर्चमधील हालचाली स्पष्ट दिसू शकत होत्या. तेवढ्यात पोर्चमधून पाच-सहा उंच नि धिप्पाड माणसे चालत त्या नियंत्रणकक्षाकडे गेली. त्यांपैकी एकाच्या हातात कागदाच्या काही पुंगळ्या होत्या. संदेश यायला दोन मिनिटे बाकी असताना शास्त्रज्ञ शर्मा व शास्त्रज्ञ

विलास त्या नियंत्रणकक्षाच्या खिडकीपाशी जाऊन थांबले.

आता सर्वजण त्या टेबलाभोवती बसले होते. टी. व्ही लावूनच ठेवला होता. मात्र त्यावर काहीच दिसत नव्हते. सुदैवाने एक खिडकी अर्धवट उघडी होती. ती माणसे त्यांच्यासमोर असलेल्या यंत्राची लाल-हिरवी बटणे दाबत होती. मग एकाने त्याच्या हातातील कागदी पुंगळया टेबलावर व्यवस्थित उलगडून ठेवल्या. त्यावर पेपरवेट ठेवले नि मग तो बोलू लागला, 'नकाशांचे काम पूर्ण झाले आहे. हे रशियाचे क्षेपणास्त्रसाठे येथे आहेत... या ठिकाणी अमेरिकेचे आणि इतर नकाशांमध्ये इतर देशांतील...' तो हातातील रूलरने दर्शवीत होता.

'व्हेरी गुड्!' त्याचे सहकारी म्हणाले.

'म्हणजे पृथ्वीवर ताबा घेण्याचाच यांचा प्लॅन दिसतो आहे!' शास्त्रज्ञ शर्मा.

'तसेच दिसते आहे एकंदरीत.' शास्त्रज्ञ विलास.

पंचवीस मिनिटे होऊन गेली तरी संदेश आलेला नव्हता. इतक्यात 'टीप् s टीप् s टीप् s' असा आवाज टेबलावरील एका मोठ्या चौकोनी यंत्रातून येऊ लागला. बहुतेक संदेश येण्यास सुरुवात झाली होती. पाठोपाठ मोठ्या टी. व्ही. वर एक चेहरा दिसू लागला.

'आता थोड्याच वेळात आपणास राष्ट्राध्यक्ष त्यांचा संदेश देतील आणि सर्व योजना समजावून सांगतील.' सूचना देण्यात येत होती.

सूचना संपताच टी. व्ही वर एक पांढरी दाढी असलेला व चष्मा घातलेला माणूस बोलू लागला, 'नकाशांचे काम पूर्ण झाले असेल, असे मी गृहीत धरतो. प्रभावी क्षेपणास्त्रे तयार करण्याबाबतची एक पुस्तिका दोन दिवसांपूर्वीच तुम्हाला पाठविलेली आहे. पृथ्वीवर ताबा मिळविण्यासाठी त्या प्रकारची क्षेपणास्त्रे बनविणे अतिशय आवश्यक आहे आणि त्याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी निष्णात शास्त्रज्ञांची एक तुकडी उद्या मध्यरात्रीपर्यंत तेथे दाखल होत आहे. क्षेपणास्त्रे त्यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीखालीच बनविली जायची आहेत. या क्षेपणास्त्रांचे वैशिष्ट्य म्हणजे ती पृथ्वीवरील क्षेपणास्त्रांचे साठे निष्क्रिय करण्यास समर्थ आहेत. तसेच त्यांच्या जोडीला आतापर्यंत तयार केलेला साठा आहेच. ही नवीन क्षेपणास्त्रे येथून पाठविता आली असती, पण वाहतुकीचा प्रश्न आहे आणि त्यात बराच काळ जाण्याची शक्यता होती, म्हणून शास्त्रज्ञांची तुकडी पोहचताच तुम्ही एक क्षणही वाया न घालविता, ती तयार करण्यास सुरुवात करावी. ती तयार होताच

नकाशांच्या आधारे पृथ्वीवरील सर्व शस्त्रास्त्रसाठे निष्क्रिय करून टाकावेत.

आणि पृथ्वीवर आपण ताबा मिळविल्याचे जाहीर करायचे. एकदा पृथ्वीवर ताबा मिळविला की, त्यांच्या सूर्यमालेतील सर्व ग्रह आपल्याच ताब्यात येतील. विश्वातील जास्तीत जास्त सूर्यमालांवर आपलेच राज्य प्रस्थापित करण्याचे स्वप्न साकार होईल. तीच तर आपली महत्त्वाकांक्षा आहे. पृथ्वीवर राज्य स्थापित होताच आपल्या ग्रहावरील काही प्रतिनिधी तेथे येतील. मात्र ही सर्व योजना राबविणे वाटते तितके सोपे नाही. आपल्या क्षेपणास्त्र-कारखान्याची हेरगिरी करणाऱ्या उपग्रहापासून संरक्षण करण्याची कायमच दक्षता बाळगत राहयला हवी. तसेच पोलिसांना काही संशय आल्यास त्यांच्या ट्रान्समीटरपेक्षा जास्त शक्तीचा ट्रान्समीटर वापरून त्यांच्या दूरसंपर्क-यंत्रणेत व्यत्यय आणा. त्याचबरोबर त्यांची शक्य तितक्या प्रमाणात दिशाभूल होईल, असेच प्रयत्न करावेत. बेस्ट ऑफ लक् !'

संदेश येणे थांबले. पाठोपाठ टी. व्ही. बंद झाला. सारा संदेश टेपरेकॉर्डवर टेप झाला होता. आता बारीकसारीक तपशील सुटण्याची अजिबात शक्यता नव्हती.

'उद्या त्यांच्या निष्णात शास्त्रज्ञांची टीम येईलच. त्यापूर्वीच आपल्याला हालचाल करायला हवी.' शास्त्रज्ञ शर्मा म्हणाले.

'एका ठिकाणाहून दुसरीकडे नेता येईल, असा ट्रान्समीटर आपल्याला वापरणे जरूर आहे.' एक उंच माणूस सर्वांना सांगत होता.

'हो, आणि याच इमारतीच्या छतावर कोणाला सहजासहजी दिसणार नाही, अशा रीतीने त्याचा अँटेना बसवावा लागणार.' दुसरा म्हणाला.

'खरे आहे.' सर्वांनी होकार दर्शविला.

रात्रीचे जवळजवळ अडीच वाजले होते. अजून त्यांची परस्परात चर्चा चालूच होती. तीन वाजता ते सर्व नियंत्रणकक्षातून जवळच असलेल्या हॉलकडे निघून गेले. नियंत्रणकक्षातले मोठे दिवे बंद झाले. फिकट गुलाबी प्रकाश सर्वत्र पसरला होता.

'विलास, तुम्ही येथेच देखरेख करीत थांबा. मी टेपरेकॉर्डर घेऊन येतो. आता आणखी जास्त वेळ येथे थांबणे चांगले नाही. शक्य तितक्या लवकर येथून बाहेर पडायला हवे नि प्रयोगशाळेत जाऊन आपल्याला आपला प्लॅन आखायला हवा.' शास्त्रज्ञ शर्मा सांगत होते.

ते बाहेर पडले तेव्हा साडेतीन वाजले होते. आजूबाजूला सर्वत्र गडद अंधार होता. 'सूं SS' असा आवाज करीत वारा वाहात होता. एक क्षणही वाया न घालविता, ते

टेपरेकॉर्डर घेऊन प्रयोगशाळेत पोहचले. चहा घेताना त्यांनी ती टेप केलेली कॅसेट काळजीपूर्वक ऐकली. आता त्यांना लवकरात लवकर हालचाल करायला हवी होती, कारण उद्या मध्यरात्री यान येणार होते. आजही त्यांना घरी जायला खूप उशीर होणार होता. तसा फोन त्यांनी घरी केला होता.

'मला वाटते, आपण हे सर्व प्रकरण आता पोलिसांकडे सुपूर्त करायला हवे.' शास्त्रज्ञ शर्मा.

'हो, म्हणजे शक्य तितक्या लवकर त्या कारखान्यावर छापा घालून सर्वांना अटक करता येईल. तसेच ते यानही ताब्यात घेता येईल.' शास्त्रज्ञ विलास.

'ट्रिंग ऽ ट्रिंग ऽ' पोलीस-इन्स्पेक्टर केतकर यांच्या टेबलावरील फोन खणखणला. हातातील फाईल बाजूला ठेवीत त्यांनी फोन घेतला.

'हॅलो ऽ, इन्स्पेक्टर स्पीकिंग.' ते हातातील घड्याळात बघत म्हणाले.

'नमस्कार मि. केतकर. मी शास्त्रज्ञ शर्मा प्रयोगशाळेतून बोलत आहे.'

'नमस्कार शास्त्रज्ञसाहेब, काय काम काढले?'

'एक अतिशय महत्त्वाचे काम आहे.'

'कोणते? सांगा.'

'फोनवर सांगण्यासारखे नाही. आपण लगेच प्रयोगशाळेत आलात तर बरे होईल.'

'डोन्ट वरी! मी निघतोच आहे.'

'थँक्स!'

'इटस् ऑल राईट!' पोलीस-इन्स्पेक्टर केतकर फोन ठेवीत म्हणाले.

चारच्या सुमारास इन्स्पेक्टर केतकरांची गाडी प्रयोगशाळेच्या गेटमधून आत शिरली. लिफ्टमधून बाहेर येताच दोन्ही शास्त्रज्ञांनी त्यांचे स्वागत केले.

'बर सांगा आता इतके महत्त्वाचे कसले काम आहे ते.' ते आरामखुर्चीत बसत म्हणाले.

दोन्ही शास्त्रज्ञांनी त्यांना आतापर्यंत घडलेली सर्व हकीकत सविस्तरपणे सांगितली.

'कमाल आहे!' ते चहाचा कप घेत म्हणाले.

'आता हीच कॅसेट ऐका म्हणजे त्यांच्या प्लॅनची संपूर्ण कल्पना येईल.' शास्त्रज्ञ विलास.

'माय गॉड!' कॅसेट संपताच इन्स्पेक्टर केतकर म्हणाले.

'उद्या-परवा बहुतेक पोलिसांच्या दूरसंपर्क-यंत्रणेत व्यत्यय आणण्यासाठी त्याच इमारतीवर अँटेना लावतील.' शास्त्रज्ञ शर्मा

'डोन्ट वरी. यू हॅव ऐ ग्रेट जॉब. तुमचे आभार कसे मानावेत, हेच कळत नाही. मी ही कॅसेट नेऊ शकतो?'

'सर्टनली!' शास्त्रज्ञ विलास.

'अच्छा, लवकरच भेटू पुन्हा.' म्हणत इन्स्पेक्टर निघून गेले.

पहाट व्हायला आली होती. हवेतील गारवा वाढलेला होता. घड्याळात पाचचे टोल पडले.


त्याच दिवशी रात्री एकच्या सुमारास त्या भूमिगत क्षेपणास्त्रांच्या कारखान्यावर छापा घालून तेथील सर्वांना अटक करण्यात आली.

आता दोन्ही शास्त्रज्ञ पोलिसांसह यान येण्याची वाट बघत होते. टेकडीच्या पायथ्याला लागूनच असलेल्या शेताला सशस्त्र पोलिसांनी वेढा दिला होता. मध्यरात्र होऊन गेली होती. मात्र अजून यान आले नव्हते. चंद्राचा शीतल प्रकाश सर्वत्र पडला होता. टेकड्या अगदी स्पष्ट दिसू शकत होत्या. पिकांवर चंद्रप्रकाश पडल्याने ती चंदेरी वाटत होती. सर्वजण टक लावून आकाशाकडे बघत होते. तेवढ्यात टेकडीच्या शिखरावर एक प्रकाशझोत दिसला नि अदृश्य झाला.

'बहुतेक यानच आले आहे.' शास्त्रज्ञ म्हणाले. पोलीस-इन्स्पेक्टर केतकरांनी ट्रान्समीटरवरून सर्व पोलिसांना तयार राहण्यास सांगितले. यानातून उतरलेल्या सर्वांना ताब्यात घेण्यात आले.

'तुमचे कारस्थान आता उघडकीस आले आहे! यापुढे पृथ्वीवर येण्याचा प्रयत्न केलात, तर गंभीर परिणाम होईल.' त्या सर्वांना यानात बसण्यास सांगून इन्स्पेक्टर केतकर म्हणाले.

***



म. सं. सं. कार्ले, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २३७ दिनांक २०/१/९०
विषय ज्ञा. वा. क्र २०..

# अपायावर मात!

भारतीय अवकाशसंशोधन-यानाला आता एक तेजस्वी तांबडी वलये असणारा ग्रह दिसू लागला होता. त्या ग्रहाच्या बरेच जवळ गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, एक कृत्रिम उपग्रह त्या ग्रहाभोवती फिरत आहे.

'ज्याअर्थी या ग्रहाभोवती कृत्रिम उपग्रह फिरताना दिसतो आहे, त्याअर्थी या ग्रहावर निश्चितच प्रगत जीवसृष्टी असणार.' शास्त्रज्ञ देवेन्द्र आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले आणि मग यान त्या ग्रहाच्या अंतर्कक्षेत शिरले.

यान त्या ग्रहावर उतरले तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला, कारण ते यानातून उतरताच त्या ग्रहावरील माणसांनी 'या! आम्ही आपलीच वाट बघत होतो. स्वागत असो!' असे म्हणत त्यांचे स्वागत केले.

त्या ग्रहावरील माणसे उंच, धिप्पाड नि गोरीपान होती. एकंदरीत प्रकार काय आहे, हेच शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांच्या लक्षात येत नव्हते.

'असे गोंधळून जाऊ नका!' त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.

तेथील वातावरण अतिशय थंड होते. चहूबाजूला दूरवर बर्फाने झाकलेल्या

पांढऱ्याशुभ्र टेकड्या दिसत होत्या. गुरुत्वाकर्षण पृथ्वीवरच्यापेक्षा बरेच कमी असल्याने तरंगल्यासारखे वाटत होते.

'चला! तुम्ही थकलेले असाल, थोडा आराम करा.' एक बराच उंच माणूस किंचित वाकून शास्त्रज्ञांशी हस्तांदोलन करीत म्हणाला.

'पण आम्ही तुमच्या ग्रहावर येणार, हे तुम्हाला कळले कसे काय?' शास्त्रज्ञ अतुल यांनी त्यांना विचारले.

'कृत्रिम उपग्रहाद्वारे आम्हाला तुमचे यान दिसले. एवढेच नाहीतर आम्ही आमच्या टी. व्ही. वर तुम्हाला बघितले देखील.'

'वा! छान!' देवेंद्र.

'चला, आपण आता मित्रच आहोत.'

एका सुंदरशा वाहनातून ते आता चालले होते. सर्वत्र अतिशय उंच उंच इमारती दिसत होत्या. रस्ते विस्तीर्ण होते. पांढऱ्याशुभ्र टेकड्यांच्या दिशेने ते जात होते. गार वारा अंगाला झोंबत होता. एका भव्य इमारतीसमोर गाडी थांबली.

'हे आमचे गेस्ट हाऊस.' त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.

थोडा आराम केल्यानंतर त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि भारतीय शास्त्रज्ञ व अंतराळवीर यांच्या गप्पा रंगल्या.

'हं आता सांगा, कोणत्या ग्रहावरून तुम्ही आलात?' त्यांच्या शास्त्रज्ञांनी विचारले.

'पृथ्वीवरून' देवेंद्र.

'पृथ्वीवरून?' किंचित् आश्चर्यचकित होत त्यांनी विचारले.

'हो. का?'

'म्हणजे अणुयुद्धाच्या गर्द छायेत असणारा ग्रहच ना?'

'अगदी बरोबर, पण हे तुम्हाला कसे कळले?'

'मागच्याच वर्षी आमचे यान गुप्तपणे पृथ्वीवर जाऊन आले आहे.'

'काय म्हणताय!'

'खरेच! आणि केवळ पृथ्वीवरच अणुयुद्धाची दाट शक्यता आहे असे नाही... तर-'

'अवकाशात असे बरेच ग्रह आहेत. यापूर्वी अशा कितीतरी ग्रहांना आम्ही मदत केली आहे.'

'म्हणजे?'

'विज्ञानाचा उपयोग आम्ही मानवी कल्याणासाठीच करतो.'

'मग आम्हाला मदत कराल?'

'का नाही! जरूर.'

'पण कोणत्या प्रकारे?'

'पृथ्वीवर भविष्यकाळात घडणाऱ्या प्रमुख घटनांचे निरीक्षण करून.'

'म्हणजे भविष्यकाळात घडणाऱ्या घटना तुम्हाला कळू शकतात?'

'हो.'

'ते कसे काय?'

'असे करू या. थोड्या वेळाने आपण आमच्या प्रयोगशाळेत जाऊया. तेथेच सारा उलगडा होईल.'

त्यांचे बोलणे ऐकून भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर चकितच झाले.

'टीर्रा ऽ टीर्रा ऽ' असा आवाज झाला. त्यांच्या खोलीतला एक गर्द हिरवा दिवा लागला.

'आपण तयार राहावे. आमचे लोक आपल्याला घेऊन जाण्यास येत आहेत.' जवळच असणाऱ्या एका त्रिकोणी यंत्रातून आवाज आला.

आता ते त्यांच्या प्रयोगशाळेकडे जात होते. रस्ते अगदी स्वच्छ होते. कोठेही भिकारी दिसत नव्हते. त्या ग्रहावरील माणसे आनंदी दिसत होती. भारतीय शास्त्रज्ञ आणि अंतराळवीरांकडे ती आश्‍चर्यचकित नजरेने बघत होती.

'आमच्या ग्रहावर दारिद्र्य नाही. संघर्ष नाही. येथे लोक सुखासमाधानाने जगतात. परस्परांवर प्रेम करतात. पशुपक्ष्यांशी प्रेमाने वागतात. नाहीतर इतर सूर्यमालिकांतील मानवच मानवजात नष्ट करायला टपला आहे.' जाता जाता त्यांचे शास्त्रज्ञ त्यांना त्या ग्रहाविषयी माहिती सांगत होते.

'ही आलीच आमची प्रयोगाळा.' डोंगरपायथ्याशी निसर्गरम्य वातावरणात उभ्या असलेल्या एका विशाल इमारतीकडे बोट दाखवीत त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.

प्रयोगशाळेत अनेक लहानमोठे हॉल्स होते. आता ते एका मोठ्या दारासमोर उभे होते. 'फ्यूचर' असा बोर्ड तेथे लावलेला होता. त्यांच्या शास्त्रज्ञाने हातातील एका छोट्या उपकरणाचे बटण दाबताच 'वीं ऽ वीं ऽ वीं' असा आवाज होऊन दार उघडले.

'चला!' ते म्हणाले.

आत जातात तर काय? नुसता गडद अंधार! गार वाऱ्याच्या झोतासारखा तो अंगाला जाणवत होता. तशा अंधारातून ते थोडा वेळ चालत गेले आणि मग अचानक लुकलुकणारे रंगीबेरंगी दिवे दिसू लागले. त्या मोठ्या हॉलमध्ये गुलाबी-हिरवा प्रकाश फाकला होता. हॉलच्या भिंतीही हिरव्या-गुलाबी दिसत होत्या. अनेक छोटी छोटी यंत्रे दिसत होती.

'हा आमचा भविष्यकथन करणारा कॉम्प्युटर. मात्र आम्ही याचा फारसा उपयोग करीत नाही. अतिशय महत्त्वाची बाब असेल, तेव्हाच उपयोग करतो.'

'म्हणजे नजीकच्या काळात पृथ्वीवर घडणाऱ्या घटना आम्हाला कळतील?'

'त्या तुम्हाला बघताही येतील.'

'ते कसे काय?'

'पण त्याआधी या कॉम्प्युटरला काही आवश्यक माहिती पुरवावी लागेल.'

'कोणती?'

'तुमच्या ग्रहाचे येथपासूनचे अंतर, सूर्यमालेतील ग्रहांची संख्या, पृथ्वीवरील सध्याची स्थिती इ...'

लगेच कॉम्प्युटरला आवश्यक ती सारी माहिती पुरविण्यात आली.

'आता भविष्यकाळाविषयी प्रश्न विचारायला हरकत नाही.' त्यांचे शास्त्रज्ञ म्हणाले.

'पृथ्वीवर अणुयुद्ध होईल का? झाल्यास केव्हा? त्याचे पृथ्वीवर होणारे संभाव्य परिणाम कोणते?' भारतीय शास्त्रज्ञांनी असे प्रश्न विचारताच त्या प्रचंड दालनात गडद अंधार पसरला.

'ॐ ऽ-ऽ ॐ' असा आवाज त्या शांत वातावरणात घुमला. पुन्हा गुलाबी-हिरवा प्रकाश सर्वत्र पसरला. आता समोरच्या उंच भिंतीच्या जागी एक मोठा पडदा दिसू लागला आणि पडद्यावर मोठ्या अक्षरात लिहिले गेले– 'अणुयुद्ध होणार! १९९१ साली!' क्षणभर पुन्हा गडद अंधार पसरला नि त्या भव्य पडद्यावर 'पृथ्वी' असा शब्द रंगीत अक्षरात लिहिला गेला आणि मग दृश्ये दिसू लागली.

- पृथ्वीवर सर्वत्र धावपळ सुरू होती. जो तो जीव मुठीत घेऊन पळत होता. आकाशातून ठिणग्यांचा पाऊस पडत होता. आकाश धुराने, धुळीच्या प्रचंड लाटांनी भरले होते. शहरे, जंगले ज्वालांनी वेढली जात होती. तांबड्या ज्वालांनी सारा प्रदेश व्यापला होता. दम कोंडत होता. रडण्याचे, ओरडण्याचे, विव्हळण्याचे आवाज

साऱ्या पृथ्वीवर घुमत होते. झाडे कोसळून पडत होती. सर्वत्र दाट धुके पसरल्यासारखे दिसत होते. आकाशाला एक जाड काळसर पडदा लावल्यासारखे वाटत होते. सूर्य दिसेनासा झाला होता. डॉक्टरांची पथके जीव वाचविण्याच्या कामी लागली होती. जीवंत राहिलेल्यांना मेलेल्यांचा हेवा वाटत होता. पाणी गोठत होते. समुद्रातील जीवजंतूही पटापट मरत होते. सर्वत्र प्रेतांचे ढीग पसरले होते. थंडीची प्रचंड लाट आली होती. पृथ्वीवर हिवाळच सुरू झाला होता. अंधाराशिवाय काहीच दिसत नव्हते. अणुयुद्धानंतर सुरू झालेली रात्र एक वर्ष राहणार होती.

'भयंकर!' असे उद्‌गार भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांच्या मुखातून निघाले. ते कितीतरी वेळ त्या भव्य पडद्याकडे बघतच राहिले आणि मग पुन्हा सर्वत्र अंधार पसरला. मग पडद्याच्या जागी भिंत दिसू लागली.

'असे घाबरून जाण्याचे कारण नाही.' त्यांचे शास्त्रज्ञ म्हणाले.

'म्हणजे?' देवेंद्र.

'तुम्ही भविष्यकाळावर नियंत्रण ठेवू शकता... अणुयुद्ध टाळू शकता किंवा झाल्यास ते पूर्णपणे निष्प्रभ करू शकता... त्यावर मात करू शकता.'

'पण कसे काय?'

'हे बघा, १९९१ साली अणुयुद्ध होणार असेल, तरी त्या ऐवजी इतर घटना घडण्यासही वाव आहे... अनेक पर्याय असू शकतात.'

'म्हणजे अणुयुद्ध आम्हाला टाळता येईल किंवा त्यावर मात करता येईल?'

'हो. अगदी पूर्णपणे. त्यासाठी एक खास यंत्र आम्ही तुम्हाला बनवून देऊ.'

'हे यंत्र कशा प्रकारचे असणार?'

'ते तयार होताच आम्ही तुम्हाला त्याची कार्यपद्धती समजावून सांगूच.'

'चालेल.'

आता त्या ग्रहावरचे शास्त्रज्ञ 'अणुयुद्ध प्रतिरोधक यंत्र' तयार करण्यात गुंतले होते. अधूनमधून ते भारतीय शास्त्रज्ञांना नि अंतराळवीरांना त्या ग्रहांवरून फेरफटका मारून आणीत. त्या ग्रहावरील संस्कृती प्रगत होती. त्यांनी स्वर्गच वसविला होता.

'हे आपले यंत्र' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ देवेंद्र यांच्या हाती एक यंत्र सोपवीत म्हणाले. ते यंत्र छोटेसे, चौकोनी नि गर्द सोनेरी रंगाचे होते. सूर्यप्रकाशात ते चमकत होते. त्या प्रकाशाने डोळे दिपत होते. अणुयुद्धावर मात करता येण्याचे समाधान भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

'हं, आता ते निळे बटण दाबून बघा.'

'पण यांना काही अपाय जर होणार नाही ना?' अतुल यांनी विचारले.

'मुळीच नाही. या यंत्राचा महत्त्वाचा फायदा हा आहे की, अणुयुद्ध होण्याची किंचित् चुणूक लागली, तरी तुम्ही या यंत्रातून निघणाऱ्या ध्वनिलहरी वातावरणात सोडून द्यायच्या. कितीतरी दिवस त्या वातावरणात तशाच राहतात आणि क्षेपणास्त्रे हवेतल्या हवेतच नष्ट करून टाकतात.'

'कमाल आहे!' देवेंद्र.

देवेन्द्रांनी ते निळे बटण दाबताच 'आँ ऽ आँ ऽ आँ ऽ' असा आवाज होऊन वेगाने ध्वनिलहरी बाहेर पडल्या.

'तर मग आता अणुयुद्धाला भिण्याचे काहीएक कारण नाही. बेस्ट ऑफ लक! पृथ्वीवरील मानवांना आमच्या शुभेच्छा द्या.'


'आपले आभार कोणत्या शब्दात मानायचे, हेच कळत नाही.'


'त्यात आभार कसले मानायचे? मानवानेच मानवाच्या अस्तित्वासाठी, प्रगतीसाठी विज्ञानाचा वापर करायला हवा ना?'

'खरे आहे. बरं, येतो आम्ही.'

आणि मग भारतीय अवकाशसंशोधन-यान पृथ्वीकडे निघाले.

***





## २१. तेजस्वी डोळ्यांचे प्राणी

भारतीय अंतराळयानाला आता एक अतिशय तेजस्वी तारा दिसू लागला होता. त्या ताऱ्याभोवती निरनिराळ्या रंगांची वलये असणारे काही ग्रहही दिसत होते. शास्त्रज्ञ नरेश आणि रवींद्र त्या ग्रहांचे अतिशय बारकाईने निरीक्षण करीत होते.

'ही अवकाशातील एखादी सूर्यमालाच असावी.' शास्त्रज्ञ नरेश शास्त्रज्ञ रवींद्र यांना म्हणाले.

'नक्कीच!' रवींद्र म्हणाले.

ते अंतराळवीरही सूर्यापेक्षाही तेजस्वी असणाऱ्या त्या ताऱ्याचे निरीक्षण करीत होते. लवकरच त्यांच्या लक्षात आले की, त्या ताऱ्याभोवती सहा ग्रह आहेत. आता त्यांचे यान त्या ताऱ्यापासून सर्वात दूर असणाऱ्या ग्रहाजवळ होते. त्या ग्रहाभोवती चकचकीत हिरवी-गुलाबी वलये होती.

'मला वाटते, आपण या ग्रहावर उतरून तेथे जीवसृष्टी अस्तित्वात आहे किंवा नाही, याचा शोध घेतल्यास या सूर्यमालेतील इतर ग्रहांसंबंधी काही अंदाज बांधता येईल.' शास्त्रज्ञ रवींद्र म्हणाले.

'खात्रीने!' नरेश म्हणाले.

यान त्या ग्रहावर उतरले तेव्हा तेथे अतिशय ऊष्ण वारे वाहात होते. धुळीचे लोटच्या लोट येत होते. त्या वाऱ्याचा 'घर्र ऽ घर्र' असा विचित्र आवाज होत होता. जवळपासच वीस-वीस मीटर उंच अशी प्रचंड झाडे होती. खूप दूरवर तांबड्या टेकड्या दिसत होत्या. बाकी सर्वत्र सपाट मैदाने दिसत होती. पहिले एक-दोन दिवस त्यांनी छोट्या यानांमधून त्या ग्रहाची पाहणी केली.

'येथे तर सपाट मैदान नि झाडे याशिवाय काहीच दिसत नाही.' नरेश म्हणाले. अधूनमधून त्या मैदानांवर त्यांना काही काळे मोठे ठिपके दिसत होते.

'येथे जीवसृष्टीस योग्य असे वातावरण तर आहे. कोणत्या का प्रकारचे असेनात पण जीव या ग्रहावर नक्कीच असायला हवेत.' रवींद्र म्हणाले. त्या ग्रहाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्याला आठ चंद्र होते. रात्री ते आठही निळसर चंद्र आकाशात दिसू लागायचे आणि मग वातावरणात गारवा येऊ लागायचा. ते चंद्र आकाशात अगदी मध्यभागी यायचे, तेव्हा सर्वत्र लख्ख निळसर प्रकाश फाकायचा, झाडांची पाने चमकू लागायची व दूरवर असणाऱ्या टेकड्या स्पष्ट दिसायच्या.

त्या दिवशी शास्त्रज्ञ नि अंतराळवीर थोडा फेरफटका मारून येण्यासाठी यानातून बाहेर पडले होते. यंत्रमानव फोटो काढण्याचे काम करीत होता. तेवढ्यात शास्त्रज्ञ रवींद्र म्हणाले, 'नरेश, ते बघ तेथे विहिरीसारखे काहीतरी दिसते आहे.'

'चला, बघू या तरी.' नरेश सहकाऱ्यांना म्हणाले. ते सर्व तेथे पोहचले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, ते एक भले मोठे विवर आहे.

'काय पण प्रचंड विवर!' रवींद्र उद्गारले. काठावरच उभे राहून त्यांनी त्या विवरात किंचित् डोकावून बघितले. आत नुसता अंधार होता. मात्र लगेच त्यांच्या लक्षात आले की, त्या विवरातून ऊष्ण हवा बाहेर पडत आहे. मधूनमधून वाफेचा लोटही येत होता.

'व्हेरी इंटरेस्टिंग!' नरेश म्हणाले. थोड्याच वेळात त्यांना कळून आले की, थोड्याच अंतरावर अशीच विवरे आहेत.

'विवरे म्हणजे एक कोडेच आहे.' रवींद्र सहकाऱ्यांशी चर्चा करताना म्हणाले.

'आणि या ग्रहावर माणसे किंवा प्राणी वावरत असल्याच्या खुणाही दिसत नाहीत.' नरेश.

'तेही खरेच.'

संध्याकाळ व्हायला आलेली होती. उष्ण वारे वाहायचे थांबून आता किंचित् गार वारे वाहू लागले होते आणि मग हळूहळू सर्वत्र अंधार वाढू लागला. अचानक भूकंप झाल्यासारखे वाटले. जमीन हादरली. पाठोपाठ हादऱ्यांचे प्रमाण वाढले. ऊष्ण वायूचे झोत येऊ लागले. प्रचंड आवाज होत धुळीचे लोटही येऊ लागले. क्षणात सर्वत्र दाट धुके पसरले.

'ज्वालामुखीचा स्फोट झाला असावा!' नरेश म्हणाले.

'पण या ग्रहावर ज्वालामुखीचे अस्तित्व तर जाणवलेच नाही.' रवींद्र उद्गारले.

'खरेच, पण मग हा प्रकार तरी काय आहे?'

तेवढ्यात दूरवर धुक्यात तेजस्वी दिव्यांसारखे काहीतरी चमकले. ते दिवे जसजसे जवळ येत होते, तसतसे जमिनीला बसणारे हादरे वाढत होते. दोन्ही शास्त्रज्ञ नि अंतराळवीर चकित होऊन बघत होते.

ते दिवे वेगाने यानाच्या दिशेने येत होते. 'घर्र ऽ घर्र ऽ' असा विचित्र आवाज वातावरणात घुमत होता. चंद्राचा प्रकाश पडू लागला होता. आता तर 'फुस् ऽ फुस् ऽ' असा श्वास घेतल्यासारखा आवाज येऊ लागला होता.

'मला वाटते, आपण लगेच एखाद्या सुरक्षित जागी जायला हवे.' रवींद्र सहकाऱ्यांना म्हणाले.

वाफ आणि धूळ यामुळे सारे वातावरण कोंदट झाले होते. लगेच ते थोड्याच अंतरावर असलेल्या प्रचंड झाडाआड संरक्षक हत्यारांसह लपले. आठही निळसर चंद्र आकाशात जवळजवळ आल्यामुळे प्रकाश वाढला होता. पाहतात तर काय! दिव्यासारख्या तेजस्वी डोळ्यांचे नि तीस फूट उंचीचे अवाढव्य प्राणी त्यांच्या यानापाशी आलेले होते. ते प्राणी रंगाने काळसर वाटत होते. चंद्राचा प्रकाश भरपूर असल्याने शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांना ते प्राणी अगदी स्पष्ट दिसत होते. त्यांची कातडी खडबडीत होती. त्यांच्या तेजस्वी डोळ्यांतून प्रकाशझोत फाकत होते नि त्यामुळे यानाच्या आसपासचे सारे स्पष्ट दिसत होते. तोंडातून ऊष्ण वाफ सोडत ते प्राणी यानाचा वास घेत होते व नाकाने 'फुरफुर' असा आवाज करीत आजूबाजूची जमीनही हुंगून पाहात होते. अधूनमधून त्यांच्या तोंडातून आगीचे छोटे छोटे लोळही बाहेर पडत होते. आता त्यांच्यापैकी एक-दोन प्राणी यानाच्या अगदी जवळ गेले होते नि काय! पुढची घटना बघून तर शास्त्रज्ञ नि अंतराळवीर यांना धक्काच बसला. त्या प्राण्यांनी जिभेने यानाला चाटताच एक भोक पडले.

'त्यांना येथून पळवून लावले नाही, तर आपल्याला याच ग्रहावर खितपत पडावे लागेल.' नरेश सहकाऱ्यांना सांगत होते.

लगेच त्यांनी उग्र वासाचा एक स्फोटक पदार्थ त्या प्राण्यांच्या दिशेने भिरकाविला. क्षणात एक प्रकारचा उग्र दर्प वातावरणात पसरला. त्या वासाने ते प्राणी बिथरले नि ऊष्ण वाफ आणि आगीचे लोळ बाहेर टाकत जोराने फुसफुसू लागले. त्यांना जोरदार शिंका येऊ लागल्या होत्या. डोळ्यांतून प्रखर प्रकाशझोत टाकत ते आजूबाजूला बघू लागले. त्यांनी यानाला धडका मारल्या आणि खूपच शिंका येऊ लागल्याने अखेर ते आले होते, त्याच दिशेला निघून गेले.

'हे प्राणी आलेत तरी कोठून याचा शोध घ्यायला हवा.' दोन्ही शास्त्रज्ञ म्हणाले.

'मी त्या प्राण्यांचा पाठलाग करतो नि ते कोठे जातात, याचा शोध घेतो.' एक अंतराळवीर म्हणाला.

'पण जरा जपून.' शास्त्रज्ञांनी त्याला [illegible] दिला. पावलांचा प्रचंड आवाज करीत ते प्राणी चालले होते. ते तोंडातून वाफ सोडीत असल्याने सारे वातावरण धुकेरी झाले होते. त्या धुक्यातूनच वाट काढीत अंतराळवीर त्या प्राण्यांचा पाठलाग करीत होता. जमिनीला जोरदार हादरे बसत असल्याने त्याला चालणे अवघड जात होते. अचानक त्यातले काही प्राणी दिसेनासे झाले. मात्र तेवढ्यात एका भल्यामोठ्या प्राण्याला त्याने विवरात शिरताना बघितले.

'आत्ताच मी एका प्राण्याला विवरात शिरताना बघितले. हे प्राणी बहुतेक विवरातच राहात असावेत.' अंतराळवीराने ट्रान्समीटरवरून शास्त्रज्ञांना सांगितले. त्या प्राण्यांचा पाठलाग करीत तो तसाच पुढे जात होता. इकडे दोन्ही शास्त्रज्ञ यानाच्या दुरुस्तीबाबत अंतराळवीरांना मार्गदर्शन करीत होते.

'आता ते प्रचंड प्राणी टेकडीच्या पलीकडे असलेल्या एका तळ्यात पोहत आहेत.' अंतराळवीराने शास्त्रज्ञांना सांगितले.

'त्या प्राण्यांवर एखादी फिल्म घेणे किंवा त्यांचे फोटो काढणे आपल्याला शक्य होईल का?' शास्त्रज्ञांनी विचारले.

'फिल्म घेणे शक्य आहे. मात्र त्यात धोका आहे, कारण येथे प्राणी सारखे येत-जात आहेत.'

'ठीक आहे. लवकरच आम्ही तेथे पोहचतो.'

'सर्व संरक्षक शस्त्रे सोबत ठेवा. टेकडी यानापासून जवळजवळ सोळाशे मीटर

दूर आहे.'

'आम्ही निघालोच. यानाची दुरुस्ती व्हायला अजून दोन तास आहेत.'

अतिशय सावधगिरीने दोन्ही शास्त्रज्ञ टेकडीच्या दिशेने निघाले. वाटेत त्यांना विवरे लागत होती. त्या विवरांतून 'फुर ऽ फुर' असा आवाज येत होता. चंद्रांचा निळसर प्रकाश झाडांच्या पानांवर पडला होता. पाने चमकत होती. मधूनच जमिनीला हादरा बसायचा. दूरच्या टेकड्या धूसर दिसत होत्या.

'जवळच्याच टेकडीवरून आपल्याला त्या प्राण्यांचे चांगले निरीक्षण करता येईल.' शास्त्रज्ञ तेथे पोहचताच अंतराळवीर त्यांना म्हणाला.


आणि मग ते तिघेही जवळच्याच टेकडीवर गेले. ते तेजस्वी डोळ्यांचे प्रचंड प्राणी तळ्यात पोहत होते. त्यांच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या आगीच्या लोळांमुळे पाण्यात उकळ्या फुटत होत्या. वाफेचे ढग तळ्यावर तरंगत होते. पोहून झाले की, ते प्राणी तळ्याच्या काठावर विसावत होते. आठही निळसर चंद्र आता आकाशात अगदी मध्यभागी आलेले असल्याने, ते त्या प्राण्यांना अगदी व्यवस्थित पाहू शकत होते. फिल्म घेण्यात त्यांना यश आले. लगेच मग टेकडी उतरून ते खाली आले आणि वेगाने पावले टाकीत अतिशय सावधपणे यानापाशी पोहचले.

'यानाची दुरुस्ती झालेली आहे.' त्यांचे सहकारी त्यांना म्हणाले.

यान उड्डाण करणार एवढ्यात दूरवरून त्यांना वाफेचे नि धुळीचे लोट येताना दिसले. जमीन हादरली. पाठोपाठ तेजस्वी डोळे चमकले.

चंद्राच्या निळसर प्रकाशात यान आकाशात झेपावले होते.

***





# २२. अखेर संकट टळले ...

'ठण् ऽ ठण् ऽ ठण् ऽ' त्या शांत वातावरणात घड्याळाचे टोले घुमले. रात्रीचे अकरा वाजले होते. भूगर्भशास्त्रज्ञ जोशी आणि डॉ. देव एका महत्त्वपूर्ण प्रयोगात गुंतले होते. एका उल्केच्या अवशेषांचे ते काळजीपूर्वक निरीक्षण करीत होते. विचारविनिमय, चर्चा चालू होती. हा प्रयोग यशस्वी झाला, तर बऱ्याच रहस्यांचा उलगडा होणार होता. सकाळपासून ते दोघेही प्रयोगशाळेत होते. भूक नि तहानही विसरले होते. ही भूगर्भशास्त्राची शाळा शहरात मध्यभागी असलेल्या एका उंच इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर होती.

आता गार वारा वाहू लागला होता. खिडक्यांमधून येणाऱ्या वाऱ्यामुळे प्रसन्न वाटत होते नि तरतरी आल्यासारखी वाटत होती. प्रयोगशाळेसमोरूनच एक लांबच लांब रस्ता टेकड्यांच्या दिशेने गेलेला होता. वाहनांचे आवाज येत होते. प्रयोगशाळेच्या मागच्या बाजूला निलगिरीची उंच उंच झाडे होती. पाने सळसळत होती. निलगिरीचा मंद वासही सुटला होता. तेवढ्यात 'ट्रींग ऽ ट्रींग ऽ' बेल वाजली.

'सखाराम, बघ तरी कोणाचा फोन आहे.' डॉ. जोशी म्हणाले.

'साहेब, घरून फोन आलाय.' शिपायाने सांगितले. आज घरी यायला उशीर होणार असल्याचे जोशींनी सांगितले. दोन्ही शास्त्रज्ञ थकल्यासारखे दिसत होते. येत्या महिन्यात भूगर्भशास्त्रज्ञांची एक आंतरराष्ट्रीय परिषद भरणार होती. ते सध्या करीत असलेला प्रयोग यशस्वी झाल्यास, ते त्यावर एक प्रबंध वाचणार होते.

'साहेब, चहा हवाय?' शिपायाने विचारले.

चहा घेतल्यावर ते शिपायाला 'आता तू गेलास तरी चालेल.' असे म्हणाले.

'जोशी, मागच्या आठवड्यात पेपरमध्ये आलेली ती बातमी तुम्ही वाचली असेलच.' डॉ. देव.

'कोणती?'

'हेच की, एका खेडेगावात एका शेतकऱ्याला शेतात वीज कोसळताना दिसली. त्याने त्या जागी जाऊन बघितले, तर एक भला मोठा खड्डा दिसला. आसपासची जमीन खणून पाहिली, तर त्याला तेथे एक सोन्याचा मोठा गोळा सापडला.'

'इटस् व्हेरी इंटरेस्टिंग!'

'त्या गोळ्याचे वजन किती होते, माहीत आहे?'

'किती?'

'बारा किलो.'

एवढ्यात त्यांना वेगळ्याच प्रकारच्या ध्वनिलहरी ऐकू येऊ लागल्या. त्या शांत वातावरणात त्या अगदी स्पष्ट ऐकू येत होत्या.

'हा आवाज कसला?' डॉ. जोशी म्हणाले. 'ट्रींग s ट्रींग s' असा आवाज होत त्या लहरी संपूर्ण प्रयोगशाळेत पसरल्या. त्या पाठोपाठ एक प्रकारचा वेगळाच वास येऊ लागला. एकंदरीत प्रकार काय आहे, हेच त्यांना कळत नव्हते. तेवढ्यात दारावरची बेल वाजली.

'कोण?' दोघांनीही विचारले.

'आम्ही!' बाहेरून उत्तर आले. आश्चर्य म्हणजे दार उघडण्यापूर्वीच दोन बुटकी माणसे आत आली. त्यांचा रंग गर्द तांबडा होता. डोक्यावर सोनेरी केस होते. प्रत्येकाच्या छातीवर एक लालसर दिवा होता नि 'कट् s कट् s' असा आवाज होऊन तो लागत-विझत होता. खोलीतला प्रकाश एकदम वाढला होता. त्यांच्या हातात कसलीतरी यंत्रे होती. त्यांना बघून दोन्ही शास्त्रज्ञांना आश्चर्याचा धक्काच बसला आणि मग हळूहळू पावले टाकीत ती दोन्ही बुटकी माणसे त्यांच्या समोर येऊन उभी

राहिली.

'आपण कोण?' दोन्ही शास्त्रज्ञांनी त्यांना विचारले.

'आम्ही परग्रहावरून आलो आहोत!' त्या दोघांपैकी एकाने फोनमधून येणाऱ्या आवाजासारखे सांगितले.

'कोणत्या?' डॉ. देव.

'अवकाशातल्या एका दूरच्या ग्रहावरून.'

'पण आपण येथे कशाकरता आलात?'

'तुम्हाला भेटायला.'

'म्हणजे?'

'आम्हाला तुमच्याकडून थोडी मदत हवी आहे.'

'कसली?'

'सांगतो - अलीकडेच आमचा ग्रह भयंकर संकटात सापडला आहे. अचानक पाण्याचे सारे साठे नष्ट होत आहेत. सागर खडखडीत कोरडे पडले आहेत. हजार मीटर्स खोदूनही पाणी लागत नाही. भूगर्भात काहीतरी प्रचंड उलथापालथ होत आहे. अधूनमधून भूकंपाचे धक्के बसतात. ज्वालामुखींचे स्फोट होतात. निद्रिस्त गणले जाणारे कितीतरी ज्वालामुखी जागृत झाले आहेत. दिवसेंदिवस ग्रहावरील तपमानात प्रचंड वाढ होत आहे. जमिनीतून निरनिराळे वायू मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. बरीच झाडे कोसळून पडत आहेत. मोठ्या वृक्षांच्या पानांतून वेगळ्याच प्रकारच्या ध्वनिलहरी ऐकू येत आहेत. काही ठिकाणी जमीन वरवर येत आहे, तर काही ठिकाणी पर्वत हळूहळू आत चालले आहेत. बरेच प्रयत्न करूनही आमच्या शास्त्रज्ञांना याची कारणे कळू शकली नाहीत. सर्वत्र हाहाःकार माजला आहे. काही दिवसातच पाण्याचा एक थेंबही मिळणे अशक्य होणार आहे आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतक्या लवकर एखाद्या दुसऱ्या ग्रहावर स्थलांतर करणेही शक्य नाही नि तसे पाहिले, तर जीवसृष्टीस योग्य वातावरण असणारे ग्रहही शोधून काढणे आता शक्य नाही. या भयंकर संकटातून आपण आम्हाला वाचवाल, याच हेतूने आम्ही इतक्या दूरुन येथे आलो आहोत.'

'पण आम्ही आपल्याला मदत करणार कशी?' जोशी म्हणाले.

'त्यात काय? तुम्ही आमच्या सोबत आमच्या ग्रहावर यायचे.'

'तुमचा ग्रह तर फार दूर आहे. किती दिवस लागतील पोहचायला?'

'दिवस कशाला? काही तासातच आपण तेथे पोहचू.'

'ते कसे?' डॉ. देव

'कारण प्रकाशाच्या वेगाने जाणारे यान आमच्यापाशी आहे. तर मग चला लवकर. काम आटोपताच आम्ही तुम्हाला येथेच आणून सोडू.'

'चालेल.'

त्यांच्यापैकी एकाने प्रयोगशाळेच्या मागच्या बाजूला असणाऱ्या ग्राउंडवर असलेले त्यांचे यान दाखविले.

यानात सर्वत्र गर्द निळसर प्रकाश पसरला होता. त्या दोन बुटक्या माणसांसोबत ते नियंत्रणकक्षात बसले होते. ती माणसे त्यांना त्यांच्या सूर्यमालेसंबंधी, त्यातील ग्रहासंबंधी माहिती देत होते. तेजस्वी तारकांजवळून यान जात होते. थोड्याच वेळात यान त्या ग्रहावर पोहचले. ते यानातून उतरले तेव्हा त्या ग्रहावर अतिशय ऊष्ण वारे वाहत होते. भयंकर उकाडा होता. सर्वत्र धावपळ चालू होती. जो तो पाण्याच्या शोधात वणवण भटकत होता. झाडांची पाने गर्द तांबडी झालेली होती नि त्यातून वेगळ्याच प्रकारच्या ध्वनिलहरी बाहेर पडत होत्या. ठिकठिकाणी जमिनीला मोठाल्या भेगा पडल्या होत्या. पशु-पक्षी पटापट मरून पडत होते. 'सूं s सूं s' असा प्रचंड आवाज करीत वाळूची वादळे पुढे सरकत होती. वातावरणात भकासपणा दाटला होता. माणसे, प्राणी, पक्षी यांचे हाल डोळ्यांनी बघवत नव्हते. सर्वजण घाबरलेले, भांबावलेले दिसत होते. पाण्याचा एक एक थेंब महत्त्वाचा होता. सारे आशाळभूतपणे आकाशाकडे बघत होते. मात्र पाऊस पडण्याचे काहीच चिन्ह दिसत नव्हते. गर्द तांबड्या सूर्याखेरीज आकाशात काहीच दिसत नव्हते. वादळी वाऱ्यामुळे डोळ्यांची आग होत होती.

'आम्ही आपलीच वाट बघत होतो.' त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ त्यांचे स्वागत करीत म्हणाले. 'आमच्या अंतराळवीरांनी आपल्याला सर्व कल्पना दिली असेलच.' त्यांचे शास्त्रज्ञ म्हणाले.

दोन्ही भारतीय भूगर्भशास्त्रज्ञांनी त्या ग्रहावरील सर्व परिस्थितीचा व्यवस्थित अभ्यास केला. 'या भयंकर संकटातून सर्वांची सुटका करण्याचा मार्ग आम्ही लवकरात लवकर शोधून काढू.'

भारतीय शास्त्रज्ञांनी टी.व्ही. वरून त्या ग्रहावरील लोकांना सांगितले. या संकटातून मार्ग काढण्यासाठी भारतीय शास्त्रज्ञ नि त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ प्रयत्नांची

पराकाष्ठा करीत होते. विचारविनिमय, चर्चा सारखी चालूच होती.

'मला वाटते, वृक्षांच्या पानांतून बाहेर पडणाऱ्या ध्वनिलहरींचा अभ्यास केल्यास काही मार्ग सापडेल.' डॉ. देव म्हणाले.

'त्याचबरोबर भूगर्भातून बाहेर येणाऱ्या वायूचाही अभ्यास करावा लागणार.' डॉ. जोशींनी सांगितले.

तासनूतास शास्त्रज्ञ त्यांच्या अभ्यासात गढून गेलेले असत. दोन्ही भारतीय शास्त्रज्ञ त्या ग्रहावरील शास्त्रज्ञांशी चर्चा करून काही निश्चित निष्कर्षाप्रत पोहचण्याचा प्रयत्न करीत होते. हे सारे चालू असतानाच भूकंप होत होते. ज्वालामुखींच्या स्फोटाचे प्रमाण वाढत होते आणि अखेर या साऱ्यांचे कारण शोधून काढण्यात भारतीय शास्त्रज्ञ यशस्वी झाले.

'तुमचा हा ग्रह नेहमीपेक्षा सूर्याकडे जास्तच झुकला आहे. त्याचाच हा परिणाम आहे.' डॉ. देव त्या ग्रहावरील शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांना सांगत होते.

'मग यावर काही उपाय?'

'आहे तर-'

'कोणता?'

'सध्यां तुमच्या ग्रहाने सूर्याशी केलेल्या कोनात किंचित् बदल घडवून आणणे आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या ग्रहावर प्रचंड गुरुत्वाकर्षणाची निर्मिती होत आहे.'

'म्हणजे?'

'तुमच्या ग्रहाने सूर्याशी सध्या केलेल्या कोनात लगेच बदलत घडवून आणला गेला नाही, तर तुमचा ग्रह सूर्याकडे खेचलाही जाऊ शकेल.'

'पण त्या कोनात बदल कसा काय घडवून आणायचा?'

आणि मग दोन्ही भारतीय शास्त्रज्ञांनी त्यांना समजावून सांगण्यास सुरुवात केली.

'हे बघा, लवकरच आपल्याला या ग्रहाभोवती दहाएक कृत्रिम उपग्रह फिरत ठेवावे लागतील. या तुमच्या ग्रहाच्या स्वतःभोवतीच्या फिरण्याच्या गतीत नको तितकी वाढ झाली आहे. त्या गतीत काही वेळ खंड पाडून आपल्याला त्याने सूर्याशी केलेला कोन बदलायचा आहे. दहाही उपग्रहांतून विशिष्ट किरणांचा मारा त्यावर करून आपल्याला हे साधता येईल.'

आणि मग क्षणाचाही विलंब न करता ती योजना कार्यान्वित झाली. त्या शास्त्रज्ञ नि अंतराळवीर पूर्णपणे यशस्वी झाले नि काय! भूकंप नि ज्वालामुखींचे स्फोट होणे काही तासांतच थांबले. त्या ग्रहावरील तपमान सर्वसाधारण झाले नि झाडांच्या पानांतून बाहेर पडणाऱ्या ध्वनिलहरी, भूगर्भातून बाहेर पडणारे वायू आता थांबले होते. हळूहळू विहिरींना पाणी आले, सागर पूर्वीसारखे झाले. त्या ग्रहावरील लोकांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

'तुम्ही आमच्या ग्रहावरील मोठे संकट टाळले. आम्ही फार फार आभारी आहोत. ही मैत्री चिरायू होवो!' त्यांचे शास्त्रज्ञ म्हणत होते.

'बरं, यतो आम्ही.' भारतीय शास्त्रज्ञ नि अंतराळवीरांनी त्या ग्रहावरील सर्वांचा निरोप घेतला.

आणि मग काही तासातच ते यानातून प्रयोगशाळेत पोहचले.

***



BVBK-0402382